१९३७-२०२६ वर्ष ९० कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

साई इन रिसॉर्ट चोंढी
अलिबाग येथे रुमबॉय व गार्डनसाठी व्यक्ती पुरुष/स्त्री पाहिजेत. (अपंग व्यक्ती चालेल) अर्जासह भेटा.

१२ नोव्हेंबरला पेन्शन अदालत

नवी मुंबई : कोकण विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या पेन्शनविषयक प्रलंबित प्रश्नांच्या निवारणासाठी गुरुवार, १२ नोव्हेंबर रोजी विभागीय पेन्शन अदालत आयोजित करण्यात आली आहे. दुपारी १२ वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सामान्य प्रशासन शाखेतील कक्ष क्रमांक १०६ येथे ही अदालत होणार आहे. नोव्हेंबर महिन्यातील दुसऱ्या मंगळवारी व बुधवारी सार्वजनिक सुट्टी असल्याने पेन्शन अदालतीची तारीख बदलण्यात आली आहे. पेन्शनविषयक तक्रारी असलेल्या निवृत्त कर्मचाऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे.

रायगड बुधवार । दि. ४ नोव्हेंबर २०२६ । अंक १४९ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

पैशाच्या वादातून तिघांचा बळी?

। रसायनी । प्रतिनिधी ।

पैशांच्या मागणीसाठी वारंवार फोन, जीवे मारण्याच्या धमक्या आणि घरात घुसून कुटुंबियांचा मानसिक छळ केल्याच्या आरोपातून रसायनीत मन सुन्न करणारी घटना घडली आहे. कथित छळाला कंटाळून एका ३० वर्षीय आईने आपल्या ११ वर्षांच्या मुलासह अवघ्या सहा वर्षांच्या मुलीला घेऊन इमारतीच्या डक्टमधून उडी मारून जीवन संपवल्याची धक्कादायक घटना भोकरपाडा येथील हिरानंदानी फॉर्च्युन सिटी परिसरात घडली. या घटनेने संपूर्ण परिसर हादरला असून, याप्रकरणी पुण्यातील विश्वनाथ देसाई आणि अक्षरा विश्वनाथ देसाई या बाप-लेकीविरुद्ध रसायनी पोलीस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्यासह विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मच्छिंद्र नारायण पोपेटा हे आपल्या कुटुंबासह हिरानंदानी फॉर्च्युन सिटीमधील मिनर्वा सोसायटीत वास्तव्यास होते. आरोपींकडून त्यांच्या मोबाईलवर वारंवार संपर्क साधून पैशांची मागणी केली जात होती. तसेच फिर्यादी आणि त्यांच्या कुटुंबियांना जीवे मारण्याच्या धमक्या देत मानसिक त्रास दिला जात असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकरणातील सर्वाधिक धक्कादायक घटना २ नोव्हेंबर रोजी रात्री सुमारे ८.४५ वाजण्याच्या सुमारास घडली. आरोपी फिर्यादीच्या घरी आले. त्यांनी घराच्या मुख्य दरवाजावर लाथा मारून दरवाजा उघडण्यास भाग पाडले आणि घरात प्रवेश केला. त्यानंतर फिर्यादीची पत्नी व मुलांना धमकावून मानसिक त्रास दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या घटनेनंतर फिर्यादीची पत्नी मानसी मच्छिंद्र पोपेटा (३०), •➤पान २ वर

पोलीस तपास सुरू

रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळाची पाहणी केली. तसेच ई-साक्ष ॲपच्या माध्यमातून पंचनामा करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रमोद जाधव पुढील तपास करीत आहेत.



- आईने दोन चिमुरड्यांसह इमारतीवरुन उडी घेत संपवलं जीवन
- पुण्यातील बाप-लेकीविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा
- हिरानंदानी फॉर्च्युन सिटी परिसरात खळबळ

वे|ध|क

उभ्या ट्रेलरला पिकअपची धडक

रसायनी : मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रेलरला भरधाव पिकअप जीपने मागून जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. सोमवारी (दि. २) पहाटे ३.०५ वाजण्याच्या सुमारास रसायनीतील पानशिल गावाच्या हद्दीत हा अपघात घडला. या दुर्घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून, दोघे जण जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, आयआरबी कंपनीचे कर्मचारी खालापूर टोलनाका ते कळंबोलीदरम्यान महामार्गावर पेट्रोलिंग करीत होते. यावेळी आयआरबी कंट्रोल रूमकडून गंभीर अपघाताची माहिती मिळताच पथकाने मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावरील किलोमीटर क्रमांक १६.८०० येथे धाव घेतली. महामार्गाच्या मेंटेनन्स पट्ट्यात ट्रेलर उभा असल्याचे यावेळी •➤पान २ वर

हापूसची पहिली पेटी वाशी मार्केटमध्ये

मुंबई : पावसाळ्यातील प्रतिकूल हवामानावर मात करत राजापूर तालुक्यातील कुवेशी-तुळसुंदे येथील आंबा बागायतदार तानाजी तांबे यांनी हापूस आंब्याचे उत्पादन घेतले आहे. त्यांच्या बागेतील सहा डझन आंब्यांची पहिली पेटी वाशी मार्केटमध्ये दाखल झाली असून, तिला सुमारे ५१ हजार रुपये दर मिळण्याची अपेक्षा आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील यंदाच्या हंगामातील ही पहिली पेटी ठरली आहे. मूळचे बारामतीचे असलेले तांबे गेल्या २९ वर्षांपासून कोकणात वास्तव्यास आहेत. चार वर्षांपूर्वी त्यांनी कुवेशी-तुळसुंदे येथे सुमारे दोन हजार आंबा कलमांची लागवड केली. पावसाळ्यातील बुरशीजन्य रोग व किडींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी औषध फवारणी आणि झाडांवर छप्पर उभारून त्यांनी मोहोर व फळांचे संरक्षण केले. येत्या आठ ते दहा दिवसांत आणखी १५ ते २० पेट्या बाजारात दाखल होण्याची अपेक्षा आहे.

१९ गावांचा विकास करा, मगच महापालिकेत घ्या!

महासभेत रणकंदन

सत्ताधारी-विरोधक आमनेसामने । नागरिकांना गॅलरीतून बाहेर काढल्याने संताप



। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

गावांना मूलभूत सुविधा नाहीत, विकासकामांचा पत्ता नाही आणि थेट महापालिकेच्या हद्दीत समावेश करण्याचा घाट घातला जात आहे. आधी गावांचा सर्वांगीण विकास करा, पाणी, रस्ते, गटारे, आरोग्य आणि शिक्षणाच्या सुविधा द्या, त्यानंतरच महापालिकेतील समावेशाचा विचार करा, असा आक्रमक पवित्रा घेत लोकनेते दि.बा. पाटील २७ गाव संघर्ष समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी यांनी प्रस्तावाला विरोध केला.

दरम्यान, सिडको नोडसह १९ गावांच्या समावेशाच्या मुद्द्यावर पनवेल महापालिकेच्या विशेष महासभेत सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आले. नगरसेविका लीना गरड यांच्या भूमिकेला नागरिकांनी टाळ्यांनी समर्थन देताच महापौरांनी नागरिकांना प्रेक्षक गॅलरीतून बाहेर काढण्याचे निर्देश दिल्याने सभागृहात प्रचंड गदारोळ झाला.

वडघर आणि गव्हाण जिल्हा परिषद गटांतील गावांसह सिडको नोडमधील १९ गावांच्या पनवेल महानगरपालिकेत समावेशाच्या प्रस्तावावर मंगळवारी (दि. ३) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात विशेष महासभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत समावेशाच्या प्रस्तावावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नगरसेविका लीना गरड यांनी गावांचा महापालिकेत समावेश करण्यास विरोध दर्शवत आपली भूमिका मांडली. त्यांच्या भाषणाला प्रेक्षक गॅलरीत उपस्थित गव्हाण आणि वडघर परिसरातील ग्रामस्थांनी टाळ्या वाजवून समर्थन दिले.

मात्र, गॅलरीतून टाळ्यांचा आवाज येताच महापौर नितीन पाटील यांनी टाळ्या वाजवणाऱ्या नागरिकांना सभागृहाबाहेर काढण्याचे निर्देश दिले. महापौरांच्या आक्षेपार्ह वक्तव्यामुळे नागरिकांमध्ये संताप पसरला. या प्रकाराबद्दल महापौरांनी जाहीर माफी मागावी, अशी मागणी करण्यात आली. •➤पान २ वर

महापौरांच्या निर्णयाचा निषेध

पनवेल महापालिकेच्या महासभेत लोकशाही मूल्यांना हरताळ फासल्याचा आरोप करत महापौर नितीन पाटील यांच्या निर्णयाचा तीव्र निषेध व्यक्त होत आहे. सभागृहात गोंधळ झाल्यानंतर नगरसेवक प्रकाश म्हात्रे यांना निलंबित करून सभागृहाबाहेर जाण्याचे निर्देश देण्यात आले. एवढेच नव्हे, तर १९ गावांच्या सम ावेशाला विरोध करणाऱ्या ग्रामस्थांनी प्रेक्षक गॅलरीतून टाळ्या वाजवून आपली भूमिका व्यक्त करताच त्यांनाही बाहेर काढण्याचे आदेश देण्यात आले. लोकप्रतिनिधी आणि नागरिकांना आपली भूमिका मांडण्याचा अधिकार असताना त्यांचा आवाज दाबण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप होत आहे. जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्याऐवजी विरोधी मतांना सभागृहाबाहेरचा रस्ता दाखवला जात असेल, तर लोकशाहीचा नेमका अर्थ काय, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

नेरळमध्ये बॅकडेटेड मान्यतांचा संशय

। अलिबाग । प्रतिनिधी ।

नेरळ परिसराच्या विकासाचे अधिकार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (एमएमआरडीए) वर्गझाले असताना रायगड जिल्हा परिषदेकडून जुन्या तारखा दाखवून प्रशासकीय मान्यता दिल्या जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. शासनाच्या अधिसूचनेनंतरही अधिकारांचा वापर कोणत्या प्राधिकरणाकडून केला जात आहे, असा सवाल उपस्थित करत सामाजिक कार्यकर्ते पत्रकार संजय गंगाराम सावंत यांनी एमएम आरडीएच्या महानगर आयुक्तांकडे तक्रार दाखल केली आहे. कथित बॅकडेटेड मान्यतांची उच्चस्तरीय चौकशी करून संशयास्पद कामांना स्थगिती देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने १९ मे २०२६ रोजी अधिसूचना काढून नेरळ परिसर विशेष नियोजन क्षेत्र म्हणून घोषित केला आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ४० (१) (क) अंतर्गत या क्षेत्राच्या नियोजन आणि विकासाचे अधिकार एमएमआरडीएकडे सोपविण्यात आले आहेत. मात्र, अधिकारांचे हस्तांतरण झाल्यानंतरही रायगड जिल्हा परिषद आणि स्थानिक प्रशासनाकडून जुन्या •➤पान २ वर

- अधिकार एमएमआरडीएकडे, तरी जि.प.कडून जुन्या तारखांच्या प्रशासकीय मान्यता?
- संजय सावंत यांची आयुक्तांकडे धाव; चौकशीसह कामांना तात्काळ स्थगितीची मागणी

शिक्षकांच्या समायोजनाला अडीच तासांचा विलंब



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाचा नियोजनशून्य कारभार मंगळवारी (दि.३) समोर आला. उपशिक्षकांच्या समायोजनाची प्रक्रिया सकाळी दहा वाजता आयोजित केली असताना अधिकारी आणि पदाधिकारी तब्बल अडीच तास उशिरा पोहोचले. त्यामुळे समायोजनासाठी •➤पान २ वर

- उपशिक्षकांना उन्हात ताटकळत बसण्याची वेळ
- जिल्ह्यातील १३४ शिक्षकांचे समुपदेशन

गुटखा विक्रीप्रकरणी एकाला अटक

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुक्यातील निजामपूर नाका परिसरात किराणा दुकानाच्या आडून प्रतिबंधित गुटख्याची विक्री करणाऱ्या ४५ वर्षीय राजेश रामकुमार चौधरी याला माणगाव पोलिसांनी अटक केली. या कारवाईत ४६ हजार ४५० रुपये किमतीचा गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला.

२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास निजामपूर येथील राजेश ट्रेडर्स दुकानाला लागून असलेल्या घरातील •➤पान २ वर

पानपट्टी व्यावसायिकांवर चोरधाड

। रायगड । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील पानपट्टी व्यावसायिकांवर सराईत चोरांनी आपली वक्रदृष्टी टाकली आहे. काळोखाचा फायदा घेत अज्ञात चोरांनी तालुक्यातील वायशेत खडताळ पूल, आरसीएफ काटा गेट आणि भाल नाक्यावर असणाऱ्या पानपट्टीमध्ये चोरी केली. पानपट्टीमधून चोरांनी धूम्रपानाचे साहित्य आणि रोख रक्कम चोरून नेल्याने पानपट्टी व्यावसायिक हतबल झाले आहेत. चोरांनी भाल नाक्यावर असणाऱ्या पानशॉपमध्ये चोरी करण्याची हॅट्ट्रिक केली. तालुक्यातील थळ परिसरात चार पानपट्ट्या फोडून चोरी केल्याने थेट पोलिसांना आव्हान दिले आहे. या वारंवार होणाऱ्या चोऱ्यांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या चोरीच्या घटनांमुळे रात्रीच्या अंधारात नक्की जागे कोण? पोलीस की चोर, असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

तालुक्यातील वायशेत येथील दिनेश पान शॉप आणि भाल फाट्यावरील •➤पान २ वर

पोलिसांसमोर चोरट्यांचे आव्हान

पोलिसांकडे या चोरांची पादत्राणे तपासादरम्यान सापडली आहेत. अद्यापही पानपट्टी फोडून चोरी करणारे चोर पसार आहेत. या चोरांना बेड्या घालण्याचे आव्हान आता पोलिसांसमोर आहे. बाळूमामा पान शॉपमध्ये चोरी झाल्याचा गुन्हा अलिबाग पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे. परंतु, अन्य चोरीच्या तक्रारी पोलिसात दिलेल्या नाहीत.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत खा. निलेश लंकेंचा दणदणीत विजय

। अहिल्यानगर । प्रतिनिधी ।

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत खासदार निलेश लंके यांनी पारनेर मतदारसंघातून दणदणीत विजय मिळवत विरोधकांना धक्का दिला. विविध कार्यकारी सेवा सोसायटी मतदारसंघातून लंके यांना १०४ पैकी ६४ मते मिळाली. त्यांनी भाजपचे विखे समर्थक उमेदवार राहुल शिंदे यांचा पराभव केला.

जिल्हा बँकेच्या २१ जागांपैकी यापूर्वीच ११ जागा बिनविरोध झाल्या होत्या. उर्वरित १० जागांसाठी सोमवारी मतदान झाले. मंगळवारी झालेल्या मतमोजणीत पारनेरची लढत विशेष प्रतिष्ठेची ठरली. या विजयामुळे निलेश लंके यांनी जिल्हा बँकेच्या राजकारणात दमदार प्रवेश केला असून, विखे गटाला राजकीय धक्का बसल्याची चर्चा आहे. दोन्ही बाजूंनी विजयासाठी जोरदार मोर्चेबांधणी करण्यात आली होती. मात्र, मतमोजणीचा निकाल जाहीर होताच लंके यांनी बाजी मारली. या निकालामुळे अहिल्यानगरच्या सहकार क्षेत्रातील राजकीय समीकरणांकडे लक्ष लागले आहे.



विखे समर्थक राहुल शिंदे यांचा पराभव; सहकार क्षेत्राच्या राजकारणात दमदार प्रवेश

सांगली जिल्हा बँकेत सत्तेचा पेच!

। सांगली । प्रतिनिधी ।

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत कोणत्याही आघाडीला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने सत्तास्थापनेचा पेच निर्माण झाला आहे. २१ सदस्यीय संचालक मंडळात महायुती आणि म हाविकास आघाडीला प्रत्येकी १० जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे बहुमतासाठी आवश्यक असलेला ११ चा आकडा गाठण्यासाठी अपक्ष विजयी झालेले माजी खासदार संजयकाका पाटील यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे.

महाविकास आघाडीत काँग्रेसला सहा, तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट)ला चार जागा मिळाल्या आहेत. महायुतीमध्ये भाजपला पाच, शिवसेना (शिंदे गट)ला तीन आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)ला दोन जागा मिळाल्या आहेत. तासगाव विकास सेवा सोसायटी गटातून माजी आमदार सुमनताई पाटील यांचा अवघ्या दोन मतांनी पराभव करून संजयकाका पाटील विजयी झाले आहेत. त्यामुळे ते आता किंगमेकरच्या भूमिकेत आले आहेत. महायुती की महाविकास आघाडी, संजयकाका कोणाला पाठिंबा देणार आणि जिल्हा बँकेचे अध्यक्षपद कोणाकडे जाणार, याकडे संपूर्ण पश्चिम महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

आधुनिक झगमगाटातही पारंपरिक कंदिलांचा क्रेझ कायम | **बांबू, कापडी, कागदी कंदिलांना पसंती**

आकाश कंदिलांनी उजळल्या बाजारपेठा!

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

दिवाळीचा प्रकाशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने रायगड जिल्ह्यातील बाजारपेठा रंगीबेरंगी आकाश कंदिलांनी उजळून निघाल्या आहेत. अलिबागसह जिल्ह्यातील विविध बाजारपेठांमध्ये आकाश कंदील आणि फटाक्यांची दुकाने सजली असून, ग्राहकांची खरेदीसाठी लगबग सुरू झाली आहे. आधुनिकतेच्या झगमगाटात विविध आकर्षक डिझाइनचे कंदील बाजारात दाखल झाले असले तरी पारंपरिक बांबू, कापडी आणि कागदी कंदिलांचा क्रेझ आजही कायम असल्याचे चित्र आहे. सर्वसामान्य ग्राहकांपासून महागड्या सजावटीची आवड असणाऱ्यांपर्यंत प्रत्येकासाठी बाजारात विविध पर्याय उपलब्ध झाले आहेत.

दिवाळीचा सण शुक्रवारी (दि. ६) सुरू होणार आहे. धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, दीपावली पाडवा, बलिप्रतिपदा आणि भाऊबीज अशा विविध सणांच्या निमित्ताने घराघरांत रोषणाई, रांगोळी आणि •➤पान २ वर



कंदिलांचे दर असे

साधे कागदी कंदील ५० ते १५० रुपये, मध्यम आकाराचे आकर्षक कंदील १५० ते ३०० रुपये, बांबू व कापडी कंदील २०० ते ६०० रुपये, तर विशेष सजावट असलेले मोठे आणि डिझायनर कंदील ७०० ते दीड हजार रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. आधुनिक सजावटीच्या वस्तूंची बाजारपेठ विस्तारत असली तरी संस्कृतीचा वारसा जपणाऱ्या पारंपरिक आकाश कंदिलांची ओढ रायगडकरांमध्ये कायम असल्याचे बाजारपेठेतील चित्रातून दिसून येत आहे.

भूमीपूजनाला मोदींची दांडी!

टोरंटसाठी हेलिपॅडवर पोलिसांचा पहारा कायम

। नेरळ । प्रतिनिधी ।

टोरंटप्रकल्पाच्यावृक्षतोडीवरून राज्यभरात पर्यावरणाचा संघर्ष पेटलेला असतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कर्जत दौऱ्याबाबत पुन्हा संभ्रम निर्माण झाला आहे. ३ नोव्हेंबर रोजी सायडोंगर येथील टोरंट जलविद्युत प्रकल्पाचे भूमीपूजन होणार असल्याची चर्चा होती. मात्र, तारीख उलटूनही पंतप्रधान कर्जतम ध्ये आले नाहीत. विशेष म्हणजे, नियोजित हेलिपॅडच्या जागेवरील पोलिसांचा रात्रंदिवस पहारा मात्र कायम आहे. आता १६ नोव्हेंबर रोजी पंतप्रधान कर्जत दौऱ्यावर येणार असल्याची चर्चा सुरू झाली असून, टोरंटच्या भूमीपूजनाचा नवा मुहूर्त नेमका कधी, असा सवाल उपस्थित होत आहे.

ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीपासूनच पंतप्रधान मोदी टोरंट प्रकल्पाच्या भूमीपूजनासाठी कर्जतमध्ये येणार असल्याची चर्चा होती. त्यानुसार कर्जत-मुरबाड मार्गावरील पुलाची वाडी परिसरात पंतप्रधानांसाठी तीन स्वतंत्र हेलिपॅड उभारण्याची तयारी करण्यात आली होती. राज्यपाल, मुख्यमंत्री आणि मंत्र्यांसाठीही स्वतंत्र हेलिपॅडची व्यवस्था केली जात होती. मात्र, २० ऑक्टोबर रोजी दसऱ्याच्या म ुहूर्तावर पाली-सायडोंगर परिसरात प्रकल्पासाठी वृक्षतोड सुरू झाली आणि संपूर्ण राज्यात पर्यावरणाचा मुद्दाऐरणीवर आला. हजारोझाडांच्या कत्तलीवरून पर्यावरणप्रेमी आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांनी आक्रम क भूमिका घेत कर्जतमध्ये धाव घेतली. टोरंट प्रकल्पाविरोधातील आंदोलनाची धार वाढत असतानाच ३ नोव्हेंबरचा प्रस्तावित पंतप्रधान दौरा झाला नाही.

दरम्यान, आज ३ नोव्हेंबर रोजी पंतप्रधान मोदी पुणे दौऱ्यावर असतानाही कर्जतच्या टोरंट प्रकल्पाच्या भूमीपूजनाबाबत कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. मात्र, पुलाची वाडी येथील नियोजित हेलिपॅडच्या ठिकाणी पोलिसांचा जागता पहारा कायम आहे. •➤पान २ वर

रेवदंडा आगरकोटच्या तटबंदीवर जेसीबी

■ बंगले-फार्महाऊससाठी पुरातन अवशेषांची तोडफोड ■ संजय सावंत यांची केंद्रीय संस्कृती मंत्र्यांकडे तक्रार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

ऐतिहासिक वारशाचे जतन करण्याऐवजी त्यावरच जेसीबी चालविण्याचा धक्कादायक प्रकार रेवदंडा येथील आगरकोट किल्ल्याया परिसरात समोर आला आहे. आलिशान बंगले आणि फार्महाऊस उभारण्यासाठी शेकडो वर्षे जुन्या ऐतिहासिक तटबंदीची तोडफोड करून पुरातन दगड आणि अवशेष जमीनदोस्त केले जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे संरक्षित स्मारक असल्याचे स्पष्ट फलक असतानाही खोदकाम आणि बांधकाम सुरू असल्याने पुरातत्व कायद्याचे तीनतेरा वाजल्याचा आरोप होत आहे. याप्रकरणी माहिती अधिकार कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत यांनी थेट केंद्रीय संस्कृती मंत्री



गजेंद्रसिंह शेखावत यांच्याकडे पुराव्यांसह लेखी तक्रार दाखल केली असून, बेकायदेशीर काम तातडीने बंद करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

रेवदंडा आगरकोट किल्ला हा ऐतिहासिक वारसा असून, त्याच्या संरक्षित परिसरात कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम किंवा खोदकाम करता येत नाही. मात्र, या नियमांना हरताळ फासून काही विकासकांकडून ऐतिहासिक तटबंदीचे दगड फोडले जात असून, जेसीबी आणि पोकलेनच्या साह्याने पुरातन अवशेषांची नासधूस केली जात असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. खासगी बंगले आणि फार्महाऊस उभारण्यासाठी हा प्रकार सुरू असल्याचा आरोप सावंत यांनी केला आहे.

प्राचीन स्मारके व पुरातत्व स्थळे आणि अवशेष कायदा १९५८/५९ (एएमएएसआर ॲक्ट) तसेच त्याअंतर्गत नियम ३२ नुसार संरक्षित स्मारकाच्या १०० मीटर परिसरात कोणतेही बांधकाम किंवा खोदकाम करण्यास मनाई आहे. हा परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून ओळखला जातो. तर पुढील २०० मीटर परिसर नियमित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला आहे. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे स्पष्ट सूचना फलक असतानाही या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

विशेष म्हणजे, स्थानिक नागरिक आणि इतिहासप्रेमींनी वारंवार तक्रारी करूनही संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रशासकीय यंत्रणेच्या दुर्लक्षामुळेच ऐतिहासिक वारशाची नासधूस सुरू असल्याचे सावंत यांनी केंद्रीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

या प्रकरणाची तातडीने विशेष तपास पथकामार्फत चौकशी करून घटनास्थळाचा पंचनामा करावा, सुरू असलेले काम त्वरित बंद करण्याचे आदेश द्यावेत, प्रतिबंधित आणि नियमित क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे हटवावीत, तसेच ऐतिहासिक वास्तूची नासधूस करणारे विकासक, कंत्राटदार आणि जमीनमालक यांच्याविरोधात एएमएएसआर कायदा व भारतीय न्याय संहितेनुसार फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशा म ागण्या करण्यात आल्या आहेत. भविष्यात किल्ल्यावर अतिक्रमण आणि तोडफोड होऊ नये यासाठी कायमस्वरूपी सुरक्षा रक्षक नेमून सीसीटीव्ही व देखरेख यंत्रणा उभारण्याची मागणीही करण्यात आली आहे.

या तक्रारीची प्रत रायगड जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी आणि अलिबाग तहसीलदार यांनाही पाठविण्यात आली आहे. तक्रारीसोबत जेसीबीद्वारे सुरू असलेल्या उत्खननाची छायाचित्रे तसेच वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीची प्रत जोडण्यात आली आहे. ऐतिहासिक वारशाची अशा प्रकारे नासधूस होत असल्याच्या आरोपांमुळे दुर्गप्रेमी आणि इतिहासप्रेमींमध्ये संताप व्यक्त होत असून, केंद्र व राज्य सरकार या प्रकरणात काय कारवाई करणार, याकडे लक्ष लागले आहे.

तुर्भेत लवकरच पादचारी पूल

■ सुरेश कुलकर्णी यांच्या पाठपुराव्याला यश



। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

तुर्भे रेल्वे स्थानकासमोर ठाणे-बेलापूर मार्ग ओलांडताना होणारे अपघात रोखण्यासाठी तात्पुरता पादचारी पूल उभारण्यात येणार आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत या कामाला सुरुवात होईल, असे आश्वासन नवी मुंबई म हापालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिले.

तुर्भे स्थानकासमोरील उड्डाणपुलाचे काम अनेक वर्षांपासून संथगतीने सुरू असल्याने नागरिकांना रस्ता ओलांडताना जीव धोक्यात घालावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नगरसेवक सुरेश कुलकर्णी यांनी उड्डाणपुलाचे काम पूर्ण होईपर्यंत तात्पुरता पादचारी पूल उभारण्यासह रस्त्यालगत विद्युत दिवे आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी केली होती. सोमवारी (दि. २) कुलकर्णी यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांसम वेत परिसराची पाहणी केली. यावेळी अधिकाऱ्यांनी पादचारी पुलाचे काम दोन ते तीन दिवसांत सुरू करण्याचे आश्वासन दिले. या पाहणीवेळी महापालिका अधिकारी, स्थानिक नागरिक तसेच शिवसेना-युवासेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

वृक्षतोडीविरोधात कर्जतकरांचा कडकडीत बंद

पर्यावरणप्रेमी, शिवसैनिकांसह विविध राजकीय पक्षांची रॅली

। नेरळ/कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील टोरंट ऊर्जा प्रकल्पामुळे पर्यावरणाचा होणारा ऱ्हास आणि मोठ्या प्रम ाणावर होणारी वृक्षतोड याविरोधात सोमवारी कर्जतकरांनी एकजूट दाखवली. शिवसेना ठाकरे गटाने पुकारलेल्या कर्जत बंदला व्यापारी, व्यावसायिक, सामाजिक संस्था आणि विविध राजकीय पक्षांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शहरातील सर्व व्यवहार बंद ठेवत पर्यावरणप्रेमी आणि शिवसैनिकांनी रॅली काढून टोरंट प्रकल्प रद्द करण्याची जोरदार मागणी केली.

शिवसेना ठाकरे गटाने २ नोव्हेंबर रोजी कर्जत बंदचे आवाहन केले होते. त्यानुसार सकाळपासूनच

कर्जत शहरातील दुकाने आणि व्यापारी प्रतिष्ठाने बंद ठेवण्यात

■ प्रकल्प रद्द करण्याची मागणी



आली. शिवसेनेच्या शिवालय कार्यालयातून कार्यकर्त्यांनी रॅली काढून बंदला पाठिंबा दिला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथून पर्यावरणप्रेमी, विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आणि सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी रॅली काढली. ही रॅली बाजारपेठ, लोकमान्य टिळक चौक मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे पोहोचली. यावेळी शिवसेना ठाकरे गट, कर्जत पर्यावरण बचाव समिती, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासह विविध संघटनांनी टोरंट प्रकल्पाला विरोध दर्शविला.

शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत यांनी बंदला सहकार्य करणाऱ्या व्यापारी आणि नागरिकांचे आभार मानले. जनतेला हा प्रकल्प नको असल्याचे बंदच्या प्रतिसादातून स्पष्ट झाले असून, दिवाळीनंतर शिवसेना नेते आदित्य ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

कर्जत पर्यावरण बचाव समितीचे ॲड. कैलास मोरे यांनी राज्यभरातून आंदोलनाला पाठिंबा मिळत असल्याचे सांगितले. प्रकल्प रद्द करण्यासाठी न्यायालयीन लढाई सुरू करण्यात आली असून, आगामी काळात सर्वांना सोबत घेऊन वर्षभर आंदोलन सुरू ठेवण्यात येईल. साखळी उपोषणाच्या माध्यमातून टोरंट प्रकल्प हद्दपार करण्यासाठी संघर्ष तीव्र केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

करवाढीपूर्वी विकासाचा हिशेब द्या!

■ पालीकरांचा नगरपंचायतीवर धडक मोर्चा
■ शेकडो नागरिकांचा घेराव, करवाढीला तूर्त स्थगिती

। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।

मूलभूत सुविधा अपुऱ्या, पाणीपुरवठा गढूळ आणि विकासकाम ांचा पत्ताच नाही; मग करवाढ कशासाठी, असा जाब विचारत पालीकरांनी सोमवारी (दि. २) नगरपंचायतीवर जोरदार धडक दिली. पाली-सुधागड संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली शेकडो नागरिकांनी नगरपंचायतीवर भव्य मोर्चा काढत कार्यालयाला घेराव घातला. मागील पाच वर्षांतील उत्पन्न, खर्च आणि विकासकामांचा हिशेब जनतेसमोर मांडल्याशिवाय प्रस्तावित घरपट्टी करवाढ मान्य करणार नाही, असा ठाम इशारा यावेळी देण्यात आला. अखेर नगराध्यक्ष पराग मेहता यांनी करवाढीचा विषय तूर्त स्थगित ठेवण्याची घोषणा केली.

छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापासून मोर्चाला सुरुवात झाली. नागरिक, व्यापारी, तरुण आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने



सहभागी झाले होते. विविध मागण्यांचे फलक आणि घोषणांनी परिसर दणाणून गेला. शहरातील फिल्टर पाणी योजनेच्या दुरवस्थेचा निषेध करण्यासाठी आंदोलकांनी फिल्टर नगरपंचायतीला भेट दिला. तर श्री हटाळेश्वर चौक ते बसस्थानक रस्त्यावरील अतिक्रमणाचा प्रश्न अधोरेखित करण्यासाठी फळांचे कॅरेट भेट देत प्रशासनाच्या दाव्यांवर उपरोधिक निशाणा साधला.

२५ वर्षांपासून पाणी योजनेच्या नावाखाली श्रेयवाद सुरू आहे की गलिच्छ राजकारण, असा सवाल उपस्थित करत नागरिकांना शुद्ध पाणी मिळत नसल्याबद्दल संताप व्यक्त करण्यात आला. नियमित कर भरूनही मूलभूत सुविधा मिळत नसतील, तर करवाढ कशाच्या आधारावर, असा सवाल संघर्ष समितीने केला. मागील पाच वर्षांचे उत्पन्न, खर्च, पूर्ण झालेली आणि रखडलेली विकासकामे यांचा सविस्तर लेखाजोखा जाहीर करण्याची मागणी करण्यात आली.

सायंकाळी नगराध्यक्ष पराग मेहता, उपनगराध्यक्ष सुलतान बेनसेकर, मुख्याधिकारी, नगरसेवक आणि संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये चर्चा झाली. पुढील बैठकीत नगरसेवक, शहरातील लोकप्रतिनिधी आणि संघर्ष समितीला सोबत घेऊन करवाढीबाबत निर्णय घेतला जाईल. तोपर्यंत करवाढीचा विषय स्थगित ठेवण्यात येईल, असे आश्वासन नगराध्यक्ष मेहता यांनी दिले.

आदिवासी बांधवांची दिवाळी गोड

अखिला मेमोरियल ट्रस्टतर्फे जीवनावश्यक वस्तू व पणत्यांचे वाटप

। उरण । प्रतिनिधी ।

स्वर्गीय अखिलाच्या स्मृती जपत अखिला मेमोरियल ट्रस्टच्या वतीने रानसई मार्गाचीवाडी आणि सागाचीवाडी येथील आदिवासी बांधवांना दिवाळीनिमित्त जीवनावश्यक वस्तू आणि पणत्यांचे वाटप करण्यात आले. रवा, मैदा, साखर, गोडेतेल, बेसन आदी साहित्यांसह दीपोत्सवासाठी सुंदर पणत्या देण्यात आल्या.

ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष बाळा सुब्रमण्यम आणि कलावतीजी सुब्रमण्यम यांनी आपल्या मुलीच्या स्मृतीप्रित्यर्थ सामाजिक कार्याचा वसा जपला आहे. गरीब व गरजू कर्करोगग्रस्त रुग्णांना मदत करण्याबरोबरच आदिवासी बांधवांना अन्नधान्य, कपडे, शैक्षणिक साहित्य आणि औषधांचे वाटप केले जाते. या उपक्रमासाठी केअर ऑफ नेचर संस्थेचे संस्थापक राजू मुंबईकर आणि संपेश पाटील यांनी विशेष सहकार्य केले.

रानसई प्राथमिक शाळेजवळील समाजमंदिरात झालेल्या कार्यक्रमाला बाळा सुब्रम ण्यम, कलावतीजी सुब्रमण्यम, राजू मुंबईकर, नारायण माने, सरपंच राधा पारधी, विलास ठाकूर, सुरेंद्र पाटील, अनिल घरत, संपेश पाटील, शाम लेंडे यांच्यासह आदिवासी महिला, पुरुष आणि लहान मुले उपस्थित होती. दिवाळी भेट मिळाल्याने आदिवासी बांधवांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.



पान १ वरुन

पैशाच्या वादातून तिघांचा बळी?

मुलगा रुद्र (११) आणि मुलगी हंसिका (६) यांनी फ्लॅटच्या डक्टमधून खाली उडी मारली. या दुर्दैवी घटनेत तिघांचाही मृत्यू झाला. आईसह दोन लहान मुलांच्या मृत्यूने परिसरात शोककळा पसरली आहे.

याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पैशांच्या वादातून झालेला कथित छळ आणि त्यानंतर घडलेली ही भीषण घटना यामुळे परिसरात संताप व्यक्त होत आहे.घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळाची पाहणी केली. तसेच ई-साक्ष ॲपच्या माध्यमातून पंचनामा करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव पुढील तपास करीत आहेत.

पैशांच्या वादातून सुरू झालेला कथित छळ, कुटुंबाला दिलेल्या धमक्या आणि घटनेच्या दिवशी घडलेला प्रकार यांची सखोल चौकशी आता पोलिसांकडून केली जात आहे. या तिहेरी मृत्यूमागील नेमकी कारणे आणि आरोपींची भूमिका तपासातून स्पष्ट होणार आहे.

नेरळमध्ये बॅकडेटेड मान्यतांचा संशय

तारखांचा आधार घेऊन प्रशासकीय मान्यता, ना-हरकत प्रमाणपत्रे आणि विकासविषयक परवानग्या दिल्या जात असल्याचा आरोप सावंत यांनी केला आहे.

या मान्यता नेमक्या कधी तयार झाल्या, मंजूर झाल्या आणि त्यावर स्वाक्षऱ्या कधी करण्यात आल्या, याची सखोल पडताळणी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. केवळ कागदपत्रांवर जुनी तारीख असल्याने गैरव्यवहार सिद्ध होत नसला, तरी प्रत्यक्ष मंजुरीची प्रक्रिया आणि संबंधित अधिकाऱ्यांचे अधिकार तपासणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. विशेषतः प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, निधी वितरण, कार्यादेश आणि प्रत्यक्ष काम सुरू झाल्याच्या तारखांची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मुंबई ३.० संकल्पनेंतर्गत कर्जत-नेरळ परिसराच्या विकासाला महत्त्व प्राप्त झाले असताना नियोजनाचे अधिकार नेमके कोणाकडे आहेत, याबाबत स्पष्टता आवश्यक आहे. अधिकारांच्या कथित गैरवापरामुळे विकासकामे आणि सार्वजनिक निधीच्या वापराबाबत गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतात, अशी चिंता सावंत यांनी व्यक्त केली आहे.

या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करावी, संशयास्पद मान्यतांशी संबंधित कामांना चौकशी पूर्ण होईपर्यंत स्थगिती द्यावी, संबंधित अधिकारी दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करावी आणि मंजूर कामे व खर्चाचे विशेष लेखापरीक्षण करावे, अशा मागण्या त्यांनी केल्या आहेत. या तक्रारीची प्रत नगरविकास विभागाचे प्रधान सचिव, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांनाही पाठविण्यात आली आहे. आता एमएमआरडीए प्रशासन या तक्रारीची दखल घेऊन कागदपत्रांची तपासणी करणार का आणि जुन्या तारखांच्या मान्यतांमागील वस्तुस्थिती स्पष्ट करणार का, याकडे नेरळ-कर्जत परिसराचे लक्ष लागले आहे.

महासभेत रणकंदन

त्यानंतर विरोधी पक्षातील नगरसेवक आणि स्थानिक नागरिकांनी सभागृहाबाहेर निदर्शने करून निषेध व्यक्त केला.दरम्यान, महासभेतील गोंधळात महापौरांनी नगरसेवक प्रकाश म्हात्रे यांना निलंबित करून सभागृहाबाहेर जाण्याचे निर्देश दिले. त्यामुळे वातावरण आणखी तापले. १९ गावांच्या समावेशाच्या मुद्द्यावरून ग्रामस्थांनीही तीव्र विरोध दर्शविला.लोकनेते दि.बा. पाटील २७ गाव संघर्ष समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी यांनीही गावांच्या विकासाचा प्रश्न उपस्थित केला. गावांचा विकास न करता केवळ महापालिकेच्या हद्दीत समावेश करण्यास आपला विरोध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महापालिकेत समावेश करण्यापूर्वी पाणीपुरवठा, रस्ते, गटारे, आरोग्य, शिक्षण यांसह सर्व मूलभूत सुविधांचा ठोस आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

महापालिकेच्या हद्दवाढीपेक्षा गावांचा प्रत्यक्ष विकास महत्त्वाचा आहे. त्यामुळे विकासाची हमी न देता समावेशाचा निर्णय लादू नये, अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. महासभेतील गदारोळ आणि नागरिकांना गॅलरीतून बाहेर काढण्याच्या प्रकारामुळे १९ गावांच्या समावेशाचा प्रश्न आता अधिकच पेटला आहे.

शिक्षकांच्या समायोजनाला अडीच तासांचा विलंब

आलेल्या १३४ उपशिक्षकांना भरउन्हात ताटकळत बसावे लागले. अखेर साडेबारा वाजता प्रक्रिया सुरू झाल्यानंतर शिक्षकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

रायगड जिल्हा परिषदेच्या कुंटेबाग येथील सभागृहात पवित्र पोर्टल प्रणालीअंतर्गत पात्र उपशिक्षकांचे समुपदेशन आयोजित करण्यात आले होते. यामध्ये मराठी माध्यमातील १३२ आणि उर्दू माध्यमातील दोन अशा एकूण १३४ उपशिक्षकांचा समावेश होता. पात्र उमेदवारांना गुणवत्तेनुसार थेट शाळा निवडण्याची संधी देण्यात आली. रिक्त व उपलब्ध शाळांची अधिकृत यादी यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आली होती.समुपदेशन प्रक्रियेत सर्वप्रथम रिक्त पदे दाखविण्यात आली. त्यानंतर गुणवत्तेनुसार उमेदवारांना शाळा निवडण्याची संधी देण्यात आली. शून्य शिक्षकी असलेल्या २८ शाळांमध्ये उपशिक्षकांची नियुक्ती करण्यात आली. उरण तालुका वगळता जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील रिक्त शाळांमध्ये शिक्षक नियुक्त करण्यात आले. जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी जालिंदर पाठारे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली.

गुटखा विक्रीप्रकरणी एकाला अटक

खोलीत प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांचा साठा असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर तळेकर आणि पथकाने छापा टाकून हा मुद्देमाल जप्त केला. संबंधित व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. प्रतिबंधित पदार्थांचा पुरवठा कुठून होत होता आणि त्यांची विक्री कोणाला केली जात होती, याचा पुढील तपास माणगाव पोलीस करीत आहेत.

पानपट्टी व्यावसायिकांवर चोरधाड

बाळूमामा पान शॉप या दोन पानपट्ट्या चोरांनी फोडून चोरी केली आहे. यामधील भाल फाट्यावरील बाळूमामा पान शॉप ही पानपट्टी चोरांनी दि. १९ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत एक, दोन नव्हे तब्बल तीन वेळा फोडली. पानपट्टी फोडून चोरांनी विविध कंपन्यांचे ८५ हजार रुपयांचे सिगारेट आणि दहा हजार रुपये रोख रक्कम लंपास केली आहे. वायशेत येथील दिनेश पान शॉप ही पानपट्टी फोडण्याचा अज्ञात चोरांनी प्रयत्न केला. मात्र, पानपट्टी फोडण्याचा आवाज आल्याने तेथील नागरिक जागे झाल्याने चोर पसार झाले.

खडताळ पुलानजीक असणारी पानपट्टी चोरांनी फोडली. या पानपट्टीमधून चोरांनी, २८ हजारांचे सिगारेट आणि तीन हजार रोख रक्कम चोरून चोर पसार झाले. आरसीएफ कंपनीच्या काटा गेटसमोर असणारी दीपक पान शॉप ही पानपट्टी अज्ञात चोरांनी फोडली. या पानपट्टीमधून चांदीची गणेशमूर्ती, सुमारे ३५ हजार रुपयांची सिगारेट, आठ हजार रुपयांची रोख रक्कम घेऊन चोरांनी पलायन केले. याबाबत एका पानपट्टी व्यावसायिकाने अलिबाग पोलिसात तक्रार दिली आहे. पोलिसांनी या चोऱ्यांचा तपास सुरू केला आहे. पोलिसांकडे या चोरांची पादत्राणे तपासादरम्यान सापडली आहेत. अद्यापही पानपट्टी फोडून चोरी करणारे चोर पसार आहेत. या चोरांना बेड्या घालण्याचे आव्हान आता पोलिसांसमोर आहे. बाळूमामा पान शॉपमध्ये चोरी झाल्याचा गुन्हा अलिबाग पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे. परंतु, अन्य तीन पानपट्ट्यांमध्ये चोरी झाल्याची तक्रार पोलिसात दाखल झाली नसल्याचे समजते. तक्रार दाखल करण्यास गेलेल्या पानपट्टी व्यावसायिकांना तपास करतो असे सांगून त्यांची बोळवण केल्याचे विश्वसनीय वृत्त आहे.

आकाश कंदिलांनी उजळल्या बाजारपेठा!

पणत्यांची सजावट केली जाणार आहे. प्रकाशाचा, आनंदाचा आणि उत्साहाचा उत्सव असलेल्या दिवाळीची चाहूल रंगीबेरंगी आकाश कंदिलांनी दिली आहे. जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये कंदिलांच्या दुकानांसह नाक्यानाक्यावर फटाक्यांची दुकानेही सजली आहेत.

दिवाळी आणि आकाश कंदील यांचे नाते अनेक पिढ्यांपासून जपले गेले आहे. अंधारावर प्रकाशाचा विजय आणि सकारात्मकतेचा संदेश देणारी ही परंपरा नव्या स्वरूपातही तितक्याच उत्साहाने पुढे सुरू आहे. रंगीबेरंगी कापड, नक्षीकाम, भरतकाम आणि सजावटीच्या साहित्यापासून तयार केलेले स्टार, गोलाकार, षटकोनी, राजवाड्याच्या आकाराचे, मोरपिसांच्या नक्षीचे तसेच पारंपरिक चांदणी आणि पेशवाई शैलीतील कंदील बाजारात उपलब्ध आहेत. लहान मुलांसाठी कार्टूनच्या आकारातील, तर आधुनिक घरांच्या सजावटीसाठी आकर्षक एलईडी लाइटिंग असलेले कंदीलही ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत.बदलत्या काळानुसार कंदिलांच्या डिझाइनमध्ये मोठे बदल झाले आहेत. मात्र, बांबूपासून तयार केलेले आणि त्यावर आकर्षक रंगसंगती असलेले कागदी कंदील ग्राहकांच्या पसंतीस उतरत आहेत. स्थानिक कलाकारांनी तयार केलेल्या पारंपरिक कंदिलांना विशेष मागणी असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे. घराच्या मुख्य प्रवेशद्वारासाठी मोठे आकर्षक कंदील, तर अंगण आणि बाल्कनीसाठी लहान कंदील खरेदी करण्याकडे ग्राहकांचा कल दिसत आहे.

उभ्या ट्रेलरला पिकअपची धडक

निदर्शनास आले. मात्र, ट्रेलर चालकाने वाहन उभे करताना इतर वाहनचालकांना सावध करण्यासाठी पार्किंग लाईट, रिफ्लेक्टर किंवा रिफ्लेक्टिव्ह त्रिकोण यांसारखी कोणतीही धोक्याची सूचना योग्य अंतरावर लावली नव्हती. तसेच निष्काळजीपणे ट्रेलर उभा केल्यामुळे पिकअप जीपची मागून धडक बसल्याचे तक्रारीत नमूद आहे.या अपघातात खारघर, कोपरागाव (नवी मुंबई) येथील एका व्यक्तीचा मृत्यू झाला, तर त्याच परिसरातील अन्य दोघे जखमी झाले. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.

भूमीपूजनाला मोदींची दांडी!

दुसरीकडे, भूमीपूजनाचा मुख्य सोहळा होण्याची शक्यता असलेल्या लाखाची वाडी येथील शासनाने भाडेतत्त्वावर दिलेल्या ५० एकर जागेवर सपाटीकरणाचे काम सुरू आहे. या परिसरातही चोवीस तास पोलिसांचा बंदोबस्त असून सर्वसामान्यांना प्रवेश नाकारला जात असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, परिसरातील शेतकऱ्यांनाही स्वतःच्या जमिनीवर शेतीची कामे करण्यासाठी जाण्यास पोलिसांकडून मज्जाव केला जात असल्याचा आरोप सावळे येथील शेतकऱ्यांनी केला आहे.

विश्वसनीय सूत्रांकडून १६ नोव्हेंबर रोजी पंतप्रधान मोदी कर्जतला येणार असल्याची चर्चा आहे. मात्र, या दौऱ्याबाबत शासनाकडून अद्याप अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. एका बाजूला टोरंट प्रकल्पाच्या वृक्षतोडीविरोधात जनक्षोभ वाढत असताना दुसऱ्या बाजूला हेलिपॅड आणि भूमिपूजनस्थळावरील कडेकोट बंदोबस्त कायम असल्याने चर्चांना उधाण आले आहे. ३ नोव्हेंबरचा मुहूर्त हुकला, आता १६ नोव्हेंबरचा वायदा खरा ठरणार का? आणि पर्यावरणाच्या प्रश्नावरून पेटलेल्या कर्जतमध्ये पंतप्रधानांच्या स्वागताची तयारी पुन्हा सुरू होणार का, याकडे संपूर्ण रायगडचे लक्ष लागले आहे.

आता १६ नोव्हेंबरचा वायदा?

टोरंट जलविद्युत प्रकल्पाच्या भूमीपूजनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी १६ नोव्हेंबर रोजी कर्जत दौऱ्यावर येणार असल्याची चर्चा विश्वसनीय सूत्रांकडून सुरू आहे. पुलाची वाडी येथील नियोजित हेलिपॅड आणि लाखाची वाडी येथील ५० एकर जागेवर पोलिसांचा रात्रंदिवस पहारा कायम आहे. मात्र, पंतप्रधानांच्या दौऱ्याबाबत अद्याप शासनाकडून अधिकृत घोषणा झालेली नाही.

निवडक



पुष्पा पाटील रंगमंचाचे अनावरण

अलिबाग : अलिबागमधील कोकण एज्यूकेशन सोसायटीच्या आवारात मंगळवारी (दि.३) लोकनेते ॲड. दत्ता पाटील यांच्या सहचारिणी पुष्पा पाटील यांच्या रंगमंचाच्या नामकरण फलकाचे अनावरण करण्यात आले. पुष्पा पाटील यांच्या स्मृतीदिनाच्या निमित्तान कोएसोचे अध्यक्ष ॲड. सिद्धार्थ पाटील यांच्या हस्ते हा अनावरण सोहळा पार पडला. तसेच, या रंगमंचाच्या बांधकामासाठी कोएसोचे संचालक संजय पाटील यांनी मातृऋणातून उतराई होण्यासाठी स्वखर्चाने पूर्ण करून दिले. या कार्यक्रमाला कोएसोच्या कार्यवाह, ॲड. पल्लवी पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता पाटील, सहाय्यक मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश पाटील, सचिव समन्वय समिती संदीप चेरकर, प्रशासन अधिकारी प्रा. सरेंद्र दातार, प्रा. डॉ. अतुल साळुंखे व कोएसो अलिबाग संकुलातील मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, सेवकवर्ग उपस्थित होते.



विविध समस्येवर प्रांत कार्यालयात बैठक

पेण : तालुक्यातील वाशी येथील सरेभाग परिसरात निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाई आणि वीज समस्येबाबत प्रांत कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत प्रांताधिकारी प्रविण पवार यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना समस्यांचे तातडीने निराकरण करण्याचे निर्देश दिले. सरेभाग परिसरासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एमजीपी) मार्फत लाखो रुपये खर्च करून पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली. मात्र, ही योजना अद्याप पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झालेली नसल्याने ऑक्टोबर महिन्यातच नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. याची गंभीर दखल घेत प्रांताधिकारी प्रविण पवार यांनी एमजीपीचे उपअभियंता योगेश पाटील यांना सक्त ताकीद देत, येत्या दोन ते तीन दिवसांत ज्या जलवाहिनीचे काम पूर्ण झाले आहे, त्या भागापर्यंत पाणी पोहोचविण्याचे निर्देश दिले आहेत. यावेळी वाशी ग्रामपंचायतीचे सरपंच संदेश ठाकूर यांनी, एमजीपीकडून काम होत नसेल तर ग्रामपंचायत स्वतःच्या खर्चाने काम करण्यास तयार असल्याचे स्पष्ट केले. मात्र, ग्रामपंचायतीच्या या भूमिकेला एमजीपीचे अधिकारी परवानगी देण्यास तयार नसल्याचे त्यांनी सांगितले. अखेर येत्या दोन ते तीन दिवसांत वासखांडीपर्यंत पाणी पोहोचविण्याचे आश्वासन उपअभियंता योगेश पाटील यांनी दिले. दरम्यान, सरेभाग परिसरातील वीज समस्येवरही बैठकीत चर्चा करण्यात आली. महावितरणचे उपअभियंता केतन थत्ते यांनी शेतीची कामे पूर्ण होताच युद्धपातळीवर प्रयत्न करून सरेभाग येथील वीज समस्या सोडविण्यात येईल, असे आश्वासन दिले.

मयूर वनगेचे मारेकरी मोकाट

पेण : उद्योजक मयूर वनगे यांना मारहाण झालेल्या घटनेला तीन महिने उलटून गेले असतानाही या प्रकरणातील आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. दरम्यान, मंगेश दळवी आणि रूपेश दळवी यांनी दाखल केलेले जामीन अर्ज जिल्हा सत्र न्यायालयाने फेटाळल्याने या प्रकरणाला पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त झाले आहे. मयूर वनगे यांना दि.१ ऑगस्ट रोजी मंगेश दळवी, हरेश दळवी, रूपेश दळवी आणि रंजीत दळवी या चौघांनी सामूहिकरीत्या मारहाण केल्याची घटना घडली होती. या प्रकरणातील आरोपी रंजीत दळवी याला न्यायालयाकडून जामीन मंजूर झाला आहे, तर हरेश दळवी याचा जामीन अर्ज यापूर्वीच जिल्हा सत्र न्यायालयाने फेटाळला होता. त्यानंतर मंगेश रघुनाथ दळवी आणि रूपेश कृष्णा दळवी यांनीही जामिनासाठी जिल्हा सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता. मात्र, न्यायालयाने दोघांचेही जामीन अर्ज फेटाळून लावले आहेत. विशेष म्हणजे, घटना घडून तीन महिने उलटले तरी मंगेश दळवी आणि रूपेश दळवी हे अद्याप पोलिसांच्या ताब्यात आलेले नसल्याची बाब समोर येत आहे. न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतरही आरोपी पोलिसांच्या हाती का लागत नाहीत, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रकरणातील आरोपी मंगेश दळवी हे भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष असल्याने या प्रकरणाला राजकीय संदर्भ जोडले जात आहेत. त्यामुळे या प्रकरणाच्या तपासाबाबत आणि आरोपींच्या अटकेबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे. आता पोलीस प्रशासन या आरोपींचा शोध घेऊन त्यांना कधी ताब्यात घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मुरुड समुद्रकिनाऱ्याकडे 'सी-गल'ची पाठ

■ एल निनोच्या प्रभावामुळे आगमन लांबले? ■ पक्षीप्रेमींसह स्थानिकांमध्ये चिंतेचे वातावरण

| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |

गेली अनेक वर्षे मुरुडकरांनी सी-गल पक्षी हजारो किलोमीटरचा प्रवास करून मुरूड समुद्रकिनारी येण्याचा प्रवास अनुभवाला आहे. दरवर्षी हे पक्षी हिवाळ्यात मूळ प्रदेश सोडून इतरत्र जातात व काही काळ त्याठिकाणी घालवून मायदेशी परततात. परंतु, यंदा समुद्रात होणाऱ्या गतिविधींमुळे नोव्हेंबर महिना उजडला तरी मुरुड समुद्रकिनारी त्यांचे आगमन झालेले नाही. समुद्रात होणाऱ्या गतिविधींमुळे या पक्ष्यांनी मुरूड समुद्रकिनाऱ्याकडे पाठ फिरवल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे पक्षीप्रेमींमधून चिंता व्यक्त होत आहे.

दरवर्षी युरोपीय प्रदेशातून हजारो सी-गल पक्षी हिवाळ्यात शेकडो किलोमीटरचा प्रवास करून कोकणच्या समुद्रकिनारपट्टीवर येतात. यादरम्यान, मुरुड-जंजिरा शहरानजीकच्या राजवाड्याजवळील समुद्रकिनारी सकाळच्या प्रहरी थव्याने आकाशात झेप घेणारे हे पक्षी वातावरणाचे रूपच पालटून टाकतात. या पक्षांची लाड भडक चोच, लाल पाय, पांढरे शुभ्र पीसांनी वेढलेले शरीर मनाला मोहरून टाकते. लडाखमध्ये हिवाळ्यात प्रचंड बर्फवृष्टी होत असल्याने पक्ष्यांना खाद्य मिळणेही कठीण होते. शिवाय प्रजननासही अडथळा निर्माण होतो. त्यामुळे हजारोंच्या संख्येने हे पक्षी कोकणासह अन्य भागात वास्तव्यास येतात. समागमानंतर साधारणत: फेब्रुवारी महिन्यात हे पक्षी अंडी घालण्यासाठी मायदेशी परततात. विशेष म्हणजे ते हजारो किलोमीटरचे अंतर एकाच उड्डाणात पूर्ण करतात. त्यामुळे पक्ष्यांचा हा प्रवास ऋतुमानानुसार अन्न व प्रजनन अनुकूल क्षेत्रापर्यंत जाण्याचे साहसी अभियानच असते. परंतु, यंदा नोव्हेंबर महिना उजाडला तरी सी-गल पक्ष्यांचे आगमन मुरूड समुद्रकिनारी झालेले नाही. समुद्रातील एल निनोच्या प्रभावामुळे त्यांचे आगमन मुरूड समुद्रकिनारी झाले नसल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे पक्षीप्रेमींमध्ये चिंतेचे वातावरण असून, पर्यटकांमधून देखील नाराजी व्यक्त केली जात आहे.



पर्यटकांचा हिरमोड

समुद्रातील एल निनोच्याप्रभावामुळे अद्याप सी-गल पक्ष्यांचे अद्याप कोकण किनारपट्टीवर आगमन न झाल्याचे एक कारण समोर येत आहे. दरवर्षी दिवाळीच्या सुट्टीत मुंबईवरून बोटीने मांडवा येथे येणाऱ्या पर्यटकांना या पक्ष्यांचे खास आकर्षण असते. तसेच, मुरुड तालुक्यातील जंजिरा किल्ला पाहण्यासाठी जाताना येथील समुद्रकिनारी सी-गल पक्ष्यांचे थवे त्यांना आकर्षित करत असतात. नेहमी हे पक्षी ऑक्टोबर महिन्यच्या सुरवातीला येतात. मात्र, आता नोव्हेंबर महिना उजाडला तरी सि-गल पक्षी किनारी दिसत नाही. हे असे पहिल्यांदाच घडल्यामुळे पक्षीप्रेमींमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, पर्यटकांचा देखील हिरमोड होत आहे.

'कुरव'चे साहसी अभियान

सी-गल पक्षी हा एक सुंदर, धीट आणि मध्यम आकाराचा समुद्रपक्षी असून, त्याला मराठीत 'कुरव' असेही म्हणतात. या पक्ष्याचा रंग प्रामुख्याने पांढरा आणि राखाडी असतो. त्याची चोच तीक्ष्ण आणि पाय जाळीदार असतात. हे पक्षी प्रामुख्याने युरोप किंवा थंडीच्या प्रदेशातून हजारो किलोमीटरचा प्रवास करून हिवाळ्यात भारतात येतात. विशेष म्हणजे ते हजारो किलोमीटरचे अंतर एकाच उड्डाणात पूर्ण करतात. त्यामुळे पक्ष्यांचा हा प्रवास अन्न व प्रजनन अनुकूल क्षेत्रापर्यंत जाण्याचे साहसी अभियानच असते. महाराष्ट्रात कोकण किनारपट्टीवर म्हणजे मुंबई पासून ते रत्नागिरी समुद्रकिनाऱ्यावर वास्तव्यास असतात. हे पक्षी मुख्यत्वे लहान मासे, खेकडे, किटक आणि मृत मासे खातात. भारतात तपकिरी आणि काळ्या डोक्याच्या मुख्य जाती आढळतात.

उरणकरांच्या दिवाळीवर महावितरणचे विरजण

■ अनेक दिवसांपासून विजेचा खेळखंडोबा

■ बिल मात्र अव्वाच्या सव्वा

| उरण | प्रतिनिधी |

उरणमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू असून, ऐन दिवाळीत या वीजपुरवठ्याच्या खेळखंडोब्याने नागरिकांच्या आनंदावरच विरजण पडले आहे. परंतु, वीजबिल मात्र अव्वाच्या सव्वा आकारले जात असल्याने महावितरणच्या कारभाराविरोधात जनतेच्या मनात संतापाची ठिणगी पडली आहे. त्यामुळे दिवाळीचा सण उजळवायचा की महावितरणच्या अंधारात चाचपडत बसायचे? असा संतप्त सवाल आता उरणकर विचारू लागले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून सकाळपासूनच वीज गायब झाल्याने उरणकरांना वाढत्या उष्णतेच्या झळांसोबत अंधाराचाही सामना करावा लागत आहे. घराघरांत उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत, तर ऐन दिवाळीच्या मुहूर्तावर वीजेवर अवलंबून असलेले व्यवसाय अक्षरशः ठप्प झाले आहेत. ग्राहकांची गर्दी असण्याच्या काळातच वीज गायब होत असल्याने व्यापारी, दुकानदार आणि लघुउद्योजकांचे आर्थिक नुकसान होत आहे. दिवाळीच्या धामधुमीत व्यवसाय करायचा की महावितरणच्या कार्यालयाचे उंबरठे झिजवायचे, असा प्रश्न व्यावसायिकांना पडला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या या लपंडावामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. परंतु, जनतेच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर स्थानिक लोकप्रतिनिधी गप्प बसून आहेत. दरम्यान, महावितरणला वीजबिल वसूल करताना ग्राहकांची आठवण होते; थकबाकी राहिली की वीजजोडणी तोडण्याची तत्परता दाखवली जाते. मात्र, ग्राहकांना नियमित वीजपुरवठा देण्याची वेळ आली की हीच तत्परता कुठल्या अंधारकोठडीत गायब होते? वीजपुरवठा खंडित होतो, उपकरणे बंद पडतात, व्यवसायाचे नुकसान होते; परंतु, बिलाचा आकडा मात्र कमी होत नाही. ग्राहकांनी पूर्ण बिल भरायचे आणि बदल्यात अंधार सहन करायचा. आता तरी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जागे व्हावे, अन्यथा जनतेच्या संतापाचा उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही, असे स्थानिक वीज ग्राहकांमधून बालले जात आहे.

रस्ते दुरुस्तीच्या कामावर संशयाचे ढग

■ कामाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न

■ ठाकरे गटाकडून चौकशीची मागणी

| पनवेल | प्रतिनिधी |

कामोठे सेक्टर ९, १० आणि २० परिसरात मे. कृष्णा कन्स्ट्रक्शन या ठेकेदारामार्फत रस्ते दुरूस्तीची कामे करण्यात आली. परंतु, या दुरुस्तीच्या कामाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. रस्त्याच्या दुरुस्तीमध्ये डांबराचा वापर, खडीचे मिश्रण, थरांची जाडी, रोलिंग आणि पृष्ठभागाच्या समतोलाबाबत प्रथमदर्शनी त्रुटी आढळल्याचा दावा करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नगरसेविका मेघना घाडगे यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्तांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. या कामाची तातडीने स्वतंत्र तांत्रिक गुणवत्ता तपासणी करून दोषी ठेकेदारासह संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दि.३०, ३१ ऑक्टोबर रोजी घेतलेल्या छायाचित्रांच्या आधारे रस्ते दुरुस्तीच्या कामातील पद्धतीवर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. खराब रस्त्याच्या भागाची योग्य कटिंग व साफसफाई, डांबरी थराची समान जाडी, जुन्या रस्त्यावर नवीन थर टाकताना आवश्यक टॅक कोट प्रक्रिया, डांबर-खडी मिश्रणाचे प्रमाण, तापमान तसेच रोलिंग आणि कॉम्पॅक्शन निर्धारित निकषांनुसार झाले आहे का, याची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. काही ठिकाणी रस्त्याचा पृष्ठभाग असमान असल्याने वाहनचालकांना त्रास होण्याबरोबरच अपघाताचा धोकाही निर्माण होऊ शकतो, असे तक्रारीत नमूद आहे. या कामाची तपासणी करताना एमओआरटीएच आणि भारतीय रस्ते काँग्रेसच्या लागू तांत्रिक मानकांचे पालन झाले आहे का, याचीही पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यासाठी डांबरी मिश्रणाचे नमुने, बिटुमेनचे प्रमाण, ग्रेडेशन, थरांची जाडी, घनता आणि कॉम्पॅक्शन यांसारख्या चाचण्या ठेकेदार व संबंधित अभियंत्यांच्या प्रभावापासून स्वतंत्र असलेल्या मान्यताप्राप्त प्रयोगशाळेमार्फत कराव्यात. तसेच, केवळ ठेकेदारावर कारवाई करून चालणार नसून कामाची देखरेख करणारे अभियंते, मोजमाप नोंदविणारे कर्मचारी, गुणवत्ता तपासणी करणारे आणि बिल मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांचीही जबाबदारी निश्चित करावी. दोष सिद्ध झाल्यास ठेकेदाराकडून स्वखर्चाने काम पुन्हा करून घेण्यासह दंड, नुकसानभरपाई आणि आवश्यकतेनुसार काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रिया सुरू करावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

शेतकऱ्यांची तहसील कार्यालयावर धडक



| रोहा | प्रतिनिधी |

लहरी वातावरणामुळे आणि पाऊस गायब झाल्याने भातपिके करपून गेली आहेत. सोमवारी पहाटेच्या मुसळधार अवकाळी पावसाने पिकाची नासाडी केली. हे वास्तव विचारात घेत राज्य शासनाच्या दुष्काळी यादीत रोहा तालुक्याचा समावेश करावा, भाताला प्रति क्विंटल साडेतीन ते ४ हजार रुपये हमीभाव मिळावा, केवायसी यंत्रणेत तातडीने सुधारणा करावी यांसह विविध मागण्यांसाठी रोहा तालुक्यातील रोहा शेतकरी प्रतिष्ठान, बळीराजा सामाजिक शेतकरी संघटना व बळीराजा फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि.२) शासकीय विश्राम गृहात विशेष बैठक पार पडली. यावेळी दि.२६ नोव्हेंबर रोजी तहसील प्रशासनावर धडक मोर्चा काढण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. यावेळी शेतकरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश भगत, भात खरेदी विक्री फेडरेशनचे अध्यक्ष हेमंत ठाकूर, कृउबा समितीचे संचालक विनायक धामणे, बळीराजा फाऊंडेशनचे संस्थापक राजेंद्र जाधव, विठ्ठल मोरे, अनंत मगर, दगडू बामुगडे, श्याम लोखंडे, महेंद्र मोरे, उद्धव आव्हाड, भारत पाटील, सुदाम महाडिक, मुकेश कुंडे, संगेश म्हात्रे, चंद्रकांत चौलकर, संतोष पडवळ, दीपक कळंबे आदी उपस्थित होते.

खारघरमध्ये लाखोंचा ऐवज लंपास

| पनवेल | प्रतिनिधी |

खारघरमध्ये भरदिवसा महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रिक्षातून प्रवास करणाऱ्या दोन महिलांची बॅग दुचाकीवरून आलेल्या दोन लुटारूंनी हिसकावून नेल्याची घटना खारघर सेक्टर १९ येथे घडली. या बॅगेमध्ये रोख रक्कम, पैठणी साडी आणि मेकअप साहित्य असा एकूण सुमारे १ लाख २३ हजार रुपयांचा ऐवज होता. या घटनेनंतर महिलांनी पोलिसांत धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी दोन लुटारूंविरोधात गुन्हा नोंदवला असून, त्यांचा शोध सुरू केला आहे.

हस्तकलेतून विक्री कौशल्याचा अनुभव



| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |

पडसरे येथील अनुदानित आश्रमशाळा व्यवसायपूर्व प्रशिक्षण विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या विविध वस्तूंच्या विक्रीचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, या उद्देशाने पाली नगरपंचायत येथे विशेष विक्री स्टॉलचे आयोजन करण्यात आले होते. या स्टॉलमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कौशल्यातून तयार केलेल्या सुगंधी उटणे, पणत्या तसेच विविध हस्तकला व उपयुक्त वस्तू विक्रीसाठी मांडण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांना केवळ वस्तू तयार करण्याचेच नव्हे, तर त्यांची मांडणी करणे, ग्राहकांशी संवाद साधणे, वस्तूंची माहिती देणे, किंमत ठरविणे आणि प्रत्यक्ष विक्री करणे यांचा अनुभव मिळावा, हा या मुख्य उद्देश होता.

हक्कासाठी शिक्षक मुंबईत एकवटले

रायगडमधून २२५ शिक्षक 'नई तालीम' यात्रेत

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

शिक्षक हक्काच संरक्षण, शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक आणि शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांसाठी शिक्षक भारतीच्यावतीने नई तालीम यात्रेचे आयोजन करण्यात आले. या यात्रेला राज्यभरातून साधारपणे ४ हजार शिक्षकांनी सहभाग घेत मुंबईमध्ये दाखल झाले होते. यावेळी रायगड जिल्ह्यातील २२५ शिक्षकांनी या यात्रेमध्ये सहभाग नोंदविला.

महात्मा गांधीच्या पुतळ्याला अभिवादन करून नाना चौक ते मणिभवन अशी 'नई तालीम' यात्रा काढण्यात आली. यावेळी शिक्षक भारतीचे अध्यक्ष अशोक बेलसरे, कार्याध्यक्ष सुभाष मोरे, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक भारतीचे राज्य उपाध्यक्ष विनोद कडव, राज्य प्रवक्ते सतिश हुले, जिल्हाध्यक्ष दिपक पाटील, उपाध्यक्ष दिपक दंत, महागांवकर, नाक्ती, तालुकाध्यक्ष तुरे, पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. या यात्रेत राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील ४ हजारहून अधिक शिक्षक सहभागी झाले होते. तर, रायगड जिल्ह्यातील २२५ शिक्षकांनी सहभाग घेत त्यांच्या प्रश्नांचा आवाज बनण्याचे काम केले. या यात्रेच्या माध्यमातून, वस्ती शाळा शिक्षकांची पुर्वी सेवा सेवेत जोडण्यात यावी. कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्यात येऊ नये. जूनी पेन्शन योजना लागू करावी. टीईटी ची सक्ती रद्द करण्यात यावी. शिक्षकांना अशैक्षिक कामे देण्यात येऊ नयेत. मुख्यालयी राहण्याची अट शिथील करून ३० किलो मीटर परिघातील क्षेत्र मुख्यालय म्हणून ग्राह्य धरण्यात यावे. विस्थापीत शिक्षकांसाठी विशेष बदलीचा टप्पा राबविण्यात यावा. आंतरजिल्हा बदलीचा टप्पा सुरू करण्यात यावा. पदवीधर शिक्षकांना सरसकट पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, या मागण्यांसाठी त्यांनी सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान, शिक्षक भारतीच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्र राज्याचे विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांची भेट घेतली.



शिवकालीन दुर्गसंस्कृती जपण्याच्या प्रयत्नाचे कौतुक | दिवाळीच्या सुट्टीत बालगोपाळांचा अनोखा उपक्रम

चिमुकल्यांनी उभारला शिववैभवाचा देखणा किल्ला

संदेश घोलप

| श्रीवर्धन |

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात लहान मुलांचा वाढता स्क्रीन टाईम हा पालकांसाठी चिंतेचा विषय ठरत असताना, श्रीवर्धन तालुक्यातील चिखलप येथील बालगोपाळांनी आपल्या कल्पकतेतून एक प्रेरणादायी उपक्रम साकारला आहे. दिवाळीच्या सुट्टीचा उपयोग करत या चिमुकल्यांनी माती, दगड आणि परिसरात उपलब्ध असलेल्या साहित्याच्या मदतीने आकर्षक शिवकिल्ला उभारला आहे. त्यांच्या या कलाकृतीतून छत्रपती शिवाजी महाराजांविषयीचे प्रेम आणि ऐतिहासिक वारसा जपण्याची भावना दिसून येत आहे.

दिवाळीच्या काळात किल्ले बनवण्याची परंपरा महाराष्ट्रात अनेक वर्षांपासून जपली जात आहे. मात्र, बदलत्या जीवनशैलीमुळे ही परंपरा काही ठिकाणी मागे पडताना दिसते. अशा परिस्थितीत चिखलप येथील मुलांनी एकत्र येऊन किल्ला साकारण्याचा घेतलेला पुढाकार कौतुकास्पद ठरत आहे. किल्ल्याच्या निर्मितीसाठी मुलांनी माती, लहान दगड, विटांचे तुकडे आणि रंगांचा कल्पक वापर केला. किल्ल्याची तटबंदी, प्रवेशद्वार, बुरुज, पायऱ्या, भगवे ध्वज तसेच आतील भागातील विविध प्रतिकृती यांची आकर्षक मांडणी करण्यात आली आहे. संपूर्ण रचनेतून ऐतिहासिक गड-किल्ल्यांचे स्वरूप उभे करण्याचा प्रयत्न मुलांनी केला आहे. या किल्ल्याची आकर्षक रचना पाहून परिसरातील नागरिक, पालक आणि दुर्गप्रेमींकडून मुलांच्या मेहनतीचे कौतुक होत आहे. लहान वयातच इतिहासाविषयी आवड निर्माण करून ती कृतीतून व्यक्त करणाऱ्या या बालगोपाळांचा उपक्रम इतर मुलांसाठीही प्रेरणादायी ठरू शकतो.



मोबाईलऐवजी सर्जनशीलतेला प्राधान्य

मोबाईल गेम्स आणि व्हिडिओमध्ये रमण्याऐवजी प्रत्यक्ष कृतीतून काहीतरी नवीन निर्माण करण्याचा आनंद या मुलांनी अनुभवला. किल्ला उभारताना नियोजन, एकमेकांना सहकार्य, कल्पकता आणि मेहनतीचे महत्त्वही त्यांना शिकायला मिळाले. अशा उपक्रमांमुळे मुलांना इतिहासाची ओळख होण्याबरोबरच आपल्या संस्कृतीविषयी अभिमान निर्माण होण्यास मदत होते.

चिखलप येथील या चिमुकल्यांनी दाखवून दिले की, योग्य कल्पना, एकजूट आणि मेहनतीच्या जोरावर लहान वयातही मोठी कलाकृती साकारता येते. शिवकिल्ल्याच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाची आठवणही जिवंत ठेवली आहे.

शिवइतीहास, दुर्गसंस्कृतीचा जागर

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा महत्त्वाचा भाग आहे. गड-किल्ल्यांच्या माध्यमातून हा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे काम अशा उपक्रमांतून घडते. चिखलप येथील बालगोपाळांनी साकारलेला शिवकिल्ला हा केवळ दिवाळीतील आकर्षण नसून, परंपरा आणि संस्कार जपण्याचा एक सुंदर प्रयत्न आहे.

कर्जतमध्ये सयाजी शिंदेंचे आंदोलन

| नेरळ | प्रतिनिधी |

टोरंट हायड्रॉलिक पॉवर प्रकल्पासाठी हजारो झाडे तोडण्यात येणार आहेत. त्यामुळे या प्रकल्पाच्या विरोधात वृक्षप्रेमी अभिनेते सयाजी शिंदे शनिवारी (दि.७) कर्जत येथे येणार आहेत. सयाजी शिंदे यांनी मुंबईत परत्रकार परिषद घेऊन सह्याद्री वाचवण्यासाठी एकजुटीने उतरल्याचे जाहीर केले असून, त्यांची जाहीर सभा कर्जत येथील प्रसिद्ध लोकमान्य टिळक चौकात होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कर्जत तालुक्यातील पाली सायडोंगर येथे सुरु असलेल्या वृक्षतोडीविरोधात पर्यावरणप्रेमी प्रचंड आक्रमक झाले आहेत. त्यांच्याकडून कर्जत येथे येऊन वेगवेगळ्या प्रकारे आंदोलन करण्यावर भर दिला जात असून अनेक निसर्गप्रेमी, कलाकार जंगलतोड विरोधात शड्डू ठोकून आहेत. यात भारतीय जीवन आणि पृथ्वी रक्षण चळवळ अभिनेते सयाजी शिंदे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. सयाजी शिंदे यांनी वृक्षतोडीच्या विरोधात एल्गार केला असून, सह्याद्री वाचवण्यासाठी स्वतः कर्जतच्या जंगलात येऊन तोडलेल्या झाडांची अवस्था पाहणार आहेत. ''सह्याद्रीमध्ये कोणतेही प्रकल्प नको असे सरकारी अहवाल असूनही सह्याद्री खोऱ्यात प्रकल्प आणले जात असतील, तर सरकारचे डोके नक्की फिरले आहे, असेच म्हणावे लागेल,'' अशी टीका अभिनेते सयाजी शिंदे यांनी केली आहे.

दिवाळीआधीचे फटाके

दिवाळी म्हणजे फटाके हे जुने समीकरण आहे. पण अलिकडे दिवाळीच्या आधी चर्चांचे आणि वादांचे फटाके उडत असतात. आवाज करणाऱ्या फटक्यांवर बंदी घालावी आणि धुराचे प्रदूषणही रोखावे असे अनेकांना वाटते. पण तसे म्हटल्यानंतर लगेच धार्मिक मुद्दे उपस्थित होत असतात. यंदाही तसेच झाले आहे. मुंबई महानगरपालिकेने नागरिकांमध्ये जागृती घडवण्यासाठी काही सेलिब्रिटी तारे-तारकांची मदत घेतली. एक दिया मिर्झा हीदेखील होती. तिच्या संदेशावरून वाद निर्माण करण्यात आला. दिया ही मुस्लिम आहे. त्यामुळेच तिचा संदेश भाजपवाल्यांना खटकला. मुंबई भाजपचे प्रमुख अमित साटम आणि महापौर रितू तावडे यांनी सण कसा साजरा करायचा हे दियाने आम्हाला शिकवू नये अशी टीका करून हा संदेश पालिकेच्या वेबसाईटवरून काढायला लावला. वास्तविक कोणतेही मानधन न घेता दियाने पालिकेच्या विनंतीवरून स्वत:हून संदेश रेकॉर्ड करून पाठवला होता. शिवाय हा संदेशही साधाच होता.तिने म्हटले होते की, दिवाळी साजरी करताना पर्यावरण व आरोग्याची काळजी घ्यावी. फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण सर्वांसाठी हानिकारक आहे. त्यामुळे आवाजाऐवजी आनंदाने दिवाळी साजरी करा इतकेच तिचे आवाहन होते. यात एरवी खटकण्यासारखे काहीच नाही. पण भाजपवाल्यांना प्रत्येक गोष्टीत हिंदू आणि मुस्लिम करायची सवय झालेली आहे. एखादी व्यक्ती मुस्लिम आहे म्हणून तिने सांगितलेली एखादी चांगली बाब ऐकायची नाही हे भयंकर आहे. एकेकाळी फटाक्यांचे आवाज फार मोठे नव्हते. शिवाय वस्त्याही छोट्या होत्या. त्यामुळे धूर आणि आवाजाचा त्रास कमी होत असे. त्यावेळी फटाके उडवण्यात थोडाफार आनंद असेल. पण आता महाराष्ट्राचे ५० टक्के नागरीकरण झाले आहे. डोक्याला डोकी लावून माणसे चोवीस तास राहतात. वस्त्या अत्यंत दाटीवाटीच्या, रस्ते अरुंद आणि गर्दीने भरलेले आणि मोकळ्या जागा अजिबात नाहीत अशी सार्वत्रिक अवस्था आहे. त्यामुळे काळानुरुप बदलणे गरजेचे आहे. हे मत दियाच नव्हे तर असंख्य हिंदूंनी यापूर्वी व्यक्त करून झाले आहे. तरीही मुंबईसारख्या महानगरीच्या महापौरांनी त्यावरून हिंदू मुस्लिम असे राजकारण पेटवावे हे गुन्हेगारी स्वरुपाचे आहे.

भाजपवाल्यांचे हिंदू-मुस्लिम

फटाके आणि धर्माचा वास्तविक काहीही संबंध नाही. मुळात दिवाळी हा धार्मिक सणच नाही. तो आनंदाचा सण आहे. त्यात गणेशोत्सवाप्रमाणे कोणतेही धार्मिक विधी अपेक्षित नाहीत. लक्ष्मीची पूजा वगैरे घरच्या घरी चालते. बाकी हा कुटुंबांचा व नात्यांचा सण आहे. फटाके हीदेखील गेल्या दोन-चारशे वर्षातील बाब असावी. त्यामुळे फटाके वाजवू नका असे सांगणे म्हणजे धर्माच्या विरोधी बोलणे होऊ शकत नाही. शिवाय पूर्वीच्या काळी समजा फटाके हा आनंदाचा भाग असला तरी आता वाढत्या लोकसंख्येमुळे तो तसा राहिलेला नाही हे मान्य करायला हवे. काळानरुप बदलायला हवे. हिंदू धर्म नेहमीच असा बदललेला आहे. म्हणूनच आज कोणीही उठसूठ यज्ञ करून त्यात पशुंचे बळी देत नाही. यज्ञात तेल, तूप इत्यादींचा नाश होतो हे सर्वांना मनापासून पटले आहे. ते न पटलेले लोक आहेत. पण ते थोडे आहेत. याच रीतीने हिंदूंनी व मुस्लिमांनी आपला पोषाख, भाषा, खाणेपिणे यातही बदल मान्य केले आहेत. अगदी साटम आणि रितू तावडे यांच्यासारखे लोकही एरवी आधुनिक सुखसोयी वापरत असतात. मुलांना संस्कृत वगैरे न शिकवता इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्येच टाकत असतात. पण त्यांना आपल्या राजकारणासाठी हिंदू विरुध्द मुस्लिम करायचे असते. याच दरम्यान भाजपचे दुसरे नवहिंदुत्ववादी नितेश राणे यांनी मुस्लिमांकडून दिवाळीच्या वस्तू खरेदी करू नका असे आवाहन केल्याच्या बातम्या आहेत. हेही एक नेहमीचे नाटक झाले आहे. वास्तविक मुंबईत फटाके घाऊक दरात मिळण्याची दुकाने बहुतेकदा मुस्लिमांची आहेत व वर्षानुवर्षे लोक त्यांच्याकडून खरेदी करत आलेले आहेत. शक्यता ही आहे की भाजपवाले आपल्या मिरवणुकांमध्ये जे फटाके वाजवते, गुलाल उधळते किंवा फुले आणते तेही मुस्लिमांकडचे असू शकतील. पण जनतेसाठी यांची आवाहने वेगळी आणि द्वेष पसरवणारी असतात. तावडे यांचे आणि त्यांच्याच पक्षातल्यां नगरसेवकांचे जमत नाही. तावडेबाईंवर देवेंद्र फडणवीसांचा वरदहस्त आहे असे म्हणतात. त्यामुळे तावडे यांनी दिया मिर्झाच्या नावाने उडवलेल्या फटाक्यांना तोही एक वास आहे.

न्यायालयाने हे करावे

दुसरीकडे दिल्लीत सर्वोच्च न्यायालयाने दोनच दिवसांसाठी हरित फटाके उडवायला परवानगी देण्याचा निर्णय काल दिला. हा निर्णय ठीक आहे. पण एक म्हणजे तो अतिशय उशिरा, अगदी दिवाळीच्या तोंडावर आलेला आहे. दुसरे म्हणजे त्याची अंमलबजावणी कशी करणार हा प्रश्न आहे. दिवाळीच्या लक्ष्मीपूजन व अन्य एका दिवशी एकेक तास हे फटाके उडवता येतील असे न्यायालयाने म्हटले आहे. अशी एका तासाची बंधने कधीही पाळली जात नसतात. समजा एका तासानंतर कोणी फटाके उडवले तर त्याला कोण पकडणार व कोण शिक्षा करणार हा प्रश्न असतो. पोलिसांकडे तेवढे मनुष्यबळ नाही व त्यांच्यात तेवढी इच्छाशक्तीही नाही. एरवीही रात्री दहानंतर लाऊडस्पीकर लावण्यास मनाई आहे. फटाके वाजवण्यास बंदी आहे. पण अनेक शहरांमध्ये वाढदिवस साजरे करण्यासाठी मध्यरात्री प्रचंड आवाजाच्या फटाक्यांच्या माळा सर्रास लावल्या जातात. लाऊडस्पीकरही वापरले जातात. त्यांच्या तक्रारी केल्या तर पोलिस दखल घेत नाहीत हा सर्वांचा अनुभव आहे. अशा वेळी सर्वोच्च न्यायालयाने आणखी एकदा जे अमलात येऊच शकणार नाहीत असे नियम घालून देण्याने काहीही साधणार नाही. उलट न्यायालयाचे हसे होईल. नियम हे न पाळण्यासाठीच असतात हा समज बळकट होईल. मध्यंतरी रस्त्यावर फटाके उडवायला बंदी आहे अशा निर्णयाची आठवण न्यायालयाने करून दिली. पण शहरांमध्ये रस्त्यांखेरीज जागाच मोकळी जागाच उरलेली नाही. त्यामुळे वाहने येत जात असतानाच मुले किंवा मोठी माणसे तिथेच फटाके उडवत असतात. हे कुठेतरी थांबण्याची गरज आहे. त्यासाठी न्यायालयाने दिवाळी संपल्यानंतर एकदाच याबाबत प्रदीर्घ सुनावणी घेऊन कडक निर्णय घ्यावेत. आवाजी फटाक्यांच्या उत्पादनावरच बंदी घालता येईल का हे तपासावे. प्रदूषण करणारे, धूर करणारे फटाके कसे रोखायचे याबाबत कडक धोरण ठरवून द्यावे. शहरातील दाटीवाटीच्या वस्तीत असे फटाके उडवता येणार नाहीत हे स्पष्ट जाहीर करावे. आपली हिंदू मंडळी अरब देशात आणि अमेरिकेत गेली की तिथले कायदे पाळतात. तिथे सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता किंवा आवाज करण्यावर बंदी असते. ते यांना मान्य होते. तिथे यांच्या धर्मावर काही आच येत नाही. हे एकदाच न्यायालयाने सर्वांना नीट समजावून सांगावे. शोभेचे फटाके किंवा दारुकाम हे मोकळ्या मैदानात करता येईल अशी मुभा द्यावी. मात्र ते मैदान पुरेसे दूर असेल याची खबरदारी घ्यायला हवी. सण हे आनंदासाठी असतात. उपद्रव देण्यासाठी किंवा आपले राजकीय शक्तीप्रदर्शन करण्यासाठी नसतात.

विचार

सन्मानाचा सोस, कर्तृत्वाचा कस

भारतीय वंशाच्या दक्षिण आफ्रिकन न्यायविद नवी पिल्लई यांना शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला, तर कॅनडाच्या लेखक ॲन कार्सन यांना साहित्याचा नोबेल पुरस्कार मिळाला. या स्वागतार्ह निर्णयावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची नाराजी व्यक्त केली. या घटनेमुळे जगात मोठे ठरण्यासाठी पुरस्काराची गरज असते, की आपल्या कामातून स्वत:चे मोठेपण सिद्ध करावे लागते, असा प्रश्न उपस्थित केला गेला आहे.



प्रा. मुक्ता पुरंदरे

सार्वजनिक जीवनात काही व्यक्तींना लोकप्रियतेची, प्रसिद्धीची आणि सन्मानाची ओढ असते; मात्र या गोष्टी मिळवण्याची पद्धत प्रत्येकाची वेगळी असते. कोणी आयुष्यभर समाजासाठी काम करते, अन्यायाविरुद्ध लढते, ज्ञानाच्या क्षेत्रात नवे मार्ग शोधते, तर कोणी आपल्या कामाची प्रसिद्धी करण्यातच अधिक ऊर्जा खर्च करते. नोबेल पुरस्काराच्या निमित्ताने डोनाल्ड ट्रम्प आणि नवी पिल्लई यांच्या संदर्भात समोर आलेली चर्चा या दोन वृत्तींमधील फरक स्पष्ट करणारी आहे. पिल्लई यांना शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला. आंतरराष्ट्रीय कायद्याचे संरक्षण, मानवी हक्कांची प्रतिष्ठापना आणि युद्धगुन्हे तसेच मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांसाठी जबाबदारी निश्चित करण्याच्या प्रयत्नांमधील योगदानाबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. त्यानंतर ट्रम्प यांनी पुरस्कार निवडीवर नाराजी व्यक्त केली. पिल्लई यांच्याविषयी आपल्याला माहिती नसल्याचा उल्लेख करत त्यांनी नोबेल समितीच्या निर्णयावर टीका केली. त्यांना स्वत:ला पुरस्कार हवा होता. गेल्या दोन वर्षांपासून ते सातत्याने त्याबाबत जाहीरपणे बोलत आहेत. नोबेल पुरस्कार हा एखाद्या व्यक्तीच्या पदाचा किंवा राजकीय सामर्थ्याचा गौरव नसतो. तो विशिष्ट क्षेत्रातील योगदानाची दखल घेणारा सन्मान आहे. अमेरिकेचे अध्यक्ष असणे ही निश्चितच मोठी जबाबदारी आहे; परंतु त्या पदामुळे एखाद्या पुरस्कारावर हक्क निर्माण होत नाही. लोकशाहीत पदाला प्रतिष्ठा असते; पण व्यक्तीचे कर्तृत्व हे पदापलीकडे जाऊन सिद्ध करावे लागते.

ट्रम्पसारख्या तोंडाळ आणि बेजबाबदार नेत्याला पुरस्कार न मिळाल्याने नाराजी वाटू शकते. निवड प्रक्रियेवर प्रश्नही उपस्थित करता येतात; मात्र त्यासाठी तर्क, पुरावे आणि निकषांचा आधार आवश्यक असतो. दुसऱ्या व्यक्तीच्या कामाची माहिती नाही, म्हणून तिचे योगदान नगण्य ठरत नाही. उलट, आपल्याला एखाद्याच्या कामाची माहिती नसेल, तर समजून घेण्याची तयारी दाखवणे हीच बौद्धिक प्रामाणिकतेची खूण आहे. ट्रम्प यांनी आपण आठ युद्धे थांबवली असल्याचा दावा केला आणि यापैकी कोणत्याही एका संघर्षातील योगदानासाठी आपल्याला शांततेचा नोबेल पुरस्कार मिळायला हवा होता, असे म्हटले. भारत-पाकिस्तानसह विविध देशांमधील संघर्षांमध्ये आपण भूमिका बजावल्याचा त्यांचा दावा आहे. त्यांनी भविष्यात इराण आणि रशिया-युक्रेन संघर्ष सोडवण्याबाबतही अपेक्षा व्यक्त केली. युद्ध थांबवण्याचे प्रयत्न महत्त्वाचे असतात. युद्धविराम घडवून आणणे, शत्रुत्व कमी करणे, चर्चेचे दरवाजे उघडणे आणि मानवी जीविताचे संरक्षण करणे या बाबींचे स्वागत केलेच पाहिजे. कोणत्याही नेत्याने अशा प्रयत्नांमध्ये यश मिळवले असेल, तर वस्तुनिष्ठ मूल्यमापन व्हायला हवे; मात्र संघर्षातील गुंतागुंत लक्षात न घेता संपूर्ण यशाचे श्रेय एका व्यक्तीला देणे योग्य ठरत नाही. युद्धविराम आणि कायमस्वरूपी शांतता या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. युद्धविरामामुळे काही काळ हिंसाचार थांबू शकतो; पण संघर्षाची मूळ कारणे कायम राहिली, तर पुन्हा युद्ध भडकण्याची शक्यता असते.

शांततेची प्रक्रिया यशस्वी होण्यासाठी राजनैतिक संवाद, परस्पर विश्वास, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि संघर्षातील सर्व संबंधित पक्षांची भूमिका महत्त्वाची असते. त्यामुळे आठ युद्धे थांबवल्याचा दावा करताना प्रत्येक संघर्षाचा घटनाक्रम, प्रत्यक्षात साध्य झालेले परिणाम आणि इतर देशांनी बजावलेली भूमिका तपासणे आवश्यक आहे. काही संघर्षांमध्ये मध्यस्थीचा प्रयत्न झाला म्हणून युद्ध पूर्णपणे संपले, असे म्हणता येत नाही. भारत-पाकिस्तानच्या बाबतीतही ट्रम्प यांच्या मध्यस्थीच्या दाव्याला भारताने मान्यता दिलेली नाही. त्यामुळे राजकीय दावे आणि अधिकृत भूमिका यामध्ये फरक करणे गरजेचे आहे. शांततेचा नोबेल पुरस्कार मिळवण्यासाठी युद्धांची संख्या सांगण्यापेक्षा संघर्ष कायमचा मिटवण्यासाठी काय केले, न्याय आणि मानवी हक्कांचे संरक्षण कसे केले आणि शांतता टिकवण्यासाठी कोणते प्रयत्न केले, हे सांगणे अधिक महत्त्वाचे ठरते. ट्रम्प यांच्या टीकेच्या पार्श्वभूमीवर पिल्लई यांनी दिलेली प्रतिक्रिया विशेष चर्चेत आली. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर जर्मनीतील एका कार्यक्रमात त्यांचे अभिनंदन करण्यात आले. उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला असताना त्या मिश्कीलपणे म्हणाल्या, 'तुम्ही आणखी जोरात टाळ्या वाजवल्या, तर कदाचित मी हा पुरस्कार ट्रम्प यांच्याबरोबर वाटून घेईन.' त्यांच्या या विधानात आक्रमकतेपेक्षा विनोद होता. ट्रम्प यांच्या नाराजीला थेट संघर्षात्मक उत्तर देण्याऐवजी त्यांनी परिस्थितीतील विसंगती अधोरेखित केली. पुरस्काराची अपेक्षा बाळगणे आणि त्यासाठी पुरेसे योगदान देणे यांतील अंतर त्यांच्या एका वाक्यातून स्पष्ट झाले.

पिल्लई यांच्या कर्तृत्वाचा विचार करताना त्यांची जीवनयात्रा समजून घेणे आवश्यक आहे. १९४१ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील डर्बन येथे भारतीय तमिळ वंशाच्या कुटुंबात जन्मलेल्या पिल्लई यांनी वर्णभेदाच्या काळात अन्याय आणि सामाजिक विषमता अनुभवली. या अनुभवांनी त्यांना कायद्याच्या माध्यमातून समानता आणि मानवी हक्कांसाठी काम करण्याची प्रेरणा दिली. १९६७ मध्ये त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील नताल प्रांतात स्वतंत्र कायदे व्यवसाय सुरू केला. वर्णभेदविरोधी कार्यकर्त्यांच्या हक्कांसाठी त्यांनी काम केले. पुढे त्या दक्षिण आफ्रिकेच्या उच्च न्यायालयातील पहिल्या कृष्णवर्णीय महिला न्यायाधीश ठरल्या. ही कामगिरी केवळ वैयक्तिक यश नव्हती. ती भेदभावाच्या व्यवस्थेविरुद्ध उभ्या राहिलेल्या एका स्त्रीच्या संघर्षाचे प्रतीक होती. पुढे रवांडातील नरसंहाराशी संबंधित आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायाधिकरणात त्यांनी न्यायाधीश आणि अध्यक्ष म्हणून काम पाहिले. युद्धगुन्हे आणि लैंगिक हिंसाचारासारख्या गंभीर अपराधांबाबत आंतरराष्ट्रीय न्यायव्यवस्थेतील तत्त्वांच्या विकासात त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले. २००३ ते २००८ या काळात त्यांनी आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम केले. त्यानंतर २००८ ते २०१४ या काळात त्या संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार उच्चायुक्त होत्या. या पदांवर काम करताना त्यांनी मानवी प्रतिष्ठा, कायद्याचे राज्य आणि गंभीर गुन्ह्यांसाठी उत्तरदायित्व निश्चित करण्यावर भर दिला. त्यांचे कार्य केवळ भाषणांपुरते मर्यादित नव्हते. आंतरराष्ट्रीय न्यायव्यवस्थेतील गुंतागुंतीच्या प्रक्रियांमध्ये त्यांनी काम केले आणि पीडितांच्या हक्कांना महत्त्व दिले.

पिल्लई यांच्या कार्याची दखल घेताना त्यांचे राजकीय किंवा आंतरराष्ट्रीय मतभेद बाजूला ठेवून त्यांनी न्यायव्यवस्थेला दिलेले योगदान समजून घेणे आवश्यक आहे. शांतता केवळ संघर्ष नसण्याचे नाव नाही. ती न्याय, उत्तरदायित्व आणि मानवी हक्कांच्या संरक्षणातून टिकून राहते, हा त्यांच्या कार्याचा मूलभूत संदेश आहे. शांततेच्या नोबेल पुरस्काराची चर्चा सुरू असतानाच साहित्याच्या क्षेत्रातही एका महिलेने जागतिक सन्मान मिळवला. कॅनडाच्या लेखक, कवी आणि अनुवादक ॲन कार्सन यांना साहित्याचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला. प्राचीन साहित्य परंपरा आणि आधुनिक अभिव्यक्ती यांचा सर्जनशील संगम घडवणाऱ्या त्यांच्या लेखनाचा गौरव करण्यात आला. कार्सन यांच्या लेखनात कविता, गद्य, अनुवाद आणि प्राचीन ग्रीक साहित्याचा अभ्यास यांचा अनोखा मिलाफ आहे. 'ऑटोबायोग्राफी ऑफ रेड' यांसारख्या साहित्यकृतींनी त्यांना जागतिक स्तरावर वेगळी ओळख दिली. परंपरा केवळ जपण्याऐवजी तिच्याशी संवाद साधत आधुनिक काळातील मानवी अनुभवांना नवे अर्थ देणे, हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. पिल्लई आणि कार्सन यांची क्षेत्रे वेगवेगळी आहेत. एकीने न्याय, मानवी हक्क आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या क्षेत्रात काम केले. दुसरीने भाषेच्या आणि साहित्याच्या माध्यमातून मानवी अनुभवांचे नवे अर्थ उलगडले; मात्र दोघींनीही आपल्या कार्यातून स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांच्या यशामागे पदाचा प्रभाव किंवा सत्तेची ताकद नव्हती. दीर्घकाळ केलेले काम, अभ्यास, विचार आणि योगदान होते.

महिलांना जागतिक स्तरावर मिळणारे असे सन्मान केवळ वैयक्तिक यशाचे प्रतीक नाहीत. समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये महिलांनी दिलेल्या योगदानाला समानतेच्या दृष्टीने मान्यता देण्याचे ते महत्त्वाचे उदाहरण आहे, तरीही नोबेल पुरस्कारांच्या इतिहासात महिलांचे प्रतिनिधित्व पुरुषांच्या तुलनेत कमी राहिले आहे. त्यामुळे अशा सन्मानांचे महत्त्व अधिक ठळक होते.

चर्चा आजची

भात कापणीवर अस्मानी संकट



यंदा खरीप हंगामात पावसामुळे अगदी पेरणीपासून ते लागवडी, कापणीपर्यंत भातशेती वाया जाण्याच्या वाटेवर ठेपली आहे. एकंदरीत चांगला पाऊस झाल्याने उत्पादनही चांगले येण्याची अपेक्षा होती. मात्र, सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात मुसळधार पाऊस झाल्याने भातशेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. दिवसा प्रखर उष्णता आणि सायंकाळी पावसाचे आगमन यामुळे बळीराजा पुरता हैराण झाला आहे. भात शेतीच्या लोंब्यांचा दाणा तयार झाला असून काही ठिकाणी भात कापणी सुरु केली आहे. कारण उन्हाच्या तिव्रतेने लोंब्यातून दाणा अलग होत असून कापणी केली नाहीतर हाताला दाणा मिळणार नाही. याच विचारांतून भात कापणी सुरु केली आहे. दिवाळी सण आधी बहुतांशी ठिकाणी भात कापणी सुरुवात झाली आहे. मात्र आता परतीच्या पावसाने बळीराजांस मोठ्या संकटात सापडलेले आहे. भात कापणी करावी की नाही हेच विचार त्यांस स्वस्त बसू देत नाही. त्यास बरोबर दुपारी रणरणत्या उन्हाची दाहकता वाढली असून भात कापणींस मजूर मिळणे कठीण झाले आहे.

प्रमोद जाधव

ऐन दिवाळीच्या तोंडावर परतीच्या पावसाच्या धारा धो धो कोसळल्या सोसाट्याच्या वारा आणि विजांचा कडकडाट त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतात पिकलेले भाताची नासाडी झाली ऐन दिवाळीच्या तोंडावर आणि भात कापणीच्या वेळेवरच पाऊस झाल्याने खूप मोठ्या प्रमाणावर बळीराजाचे नुकसान झाले आहे.आठवडाभरापासून सातत्याने बदलत असणाऱ्या हवामानाचा फटका शेतकऱ्यांना बसला असून, जिल्ह्यातील हाताशी आलेली भातशेती गमावण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. त्यामुळे परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांवर नुकसानीचे मोठे संकट आले आहे. परतीच्या पावसाच्या सरी अजूनही सुरू असून याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. दरदिवशी वातावरणात बदल पहायला मिळत आहे. सध्या भातपिक कापणीला आली असून, जिल्ह्यातील काही भागामध्ये भात कापणीला सुरुवात झाली आहे. मात्र आठवडाभर पडणाऱ्या पावसामुळे भातकापणीला व्यत्यय येतो आहे. पाऊस कधीही येत असल्याने भात कापणी रखडली आहे. अचानक वादळी वाऱ्यासह कोसळणाऱ्या या पावसामुळे भात पिक जमिनीवर आडवी पडली आहेत.

पावसामुळे शेतकऱ्यांच्या उरल्यासुरल्या आशांवर पाणी फेरले आहे. कापणीसाठी तयार असलेल्या भाताचे दाणे भिजल्यामुळे त्याला अंकुर आले आहेत. त्यामुळे पीक पूर्णपणे वाया गेले आहे. या आपत्तीने शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले आहे. प्रशासनाने तातडीने पावले उचलून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

साधारणत: दसऱ्याच्या मुहूर्तावर भातपीक कापणीचा शेतकऱ्यांचे नियोजन होते. जिल्ह्यातील सर्वच ग्रामीण परिसरातील शेतकऱ्यांनी दरवर्षीप्रमाणे यंदा मोठ्या प्रमाणात भात पिकाची लावणी केली होती. कापणीच्या शेवटच्या टप्प्यात निसर्गाची अवकृपा झाली असल्याने चिंतेचे ढग दाटले आहे. शेतात डोलणाऱ्या पिकांवर अवकाळी बरसत असल्याने पिकांची नासाडी होत आहे. गेल्या आठ नऊ दिवसांपासून जिल्ह्यात अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने कापणीसाठी आलेल्या भात पिकाचे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना आश्रू अनावर होत असून शेतकरी मोठ्या संकटात सापडला सापडला आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या ढगाळ वातावरणासह सुरू असलेल्या पावसामुळे कापणी रखडली आहे. आधीच कापलेले भाताचे पीक ओलसर राहून खराब होत आहे. सततच्या आर्द्रतेमुळे भाताची गुणवत्ता घटू लागली असून या पावसाचा फटका तालुक्यातील सर्वच भागांतील शेतकऱ्यांना बसत आहे. जिल्ह्यात भात हे प्रमुख पीक घेतले जाते. प्रत्येक वर्षी या भागात जून महिन्यात भात लागवडीला सुरुवात होते आणि ऑक्टोबरच्या शेवटी कापणी सुरू होते. मात्र, यावर्षी हवामानातील अनिश्चिततेमुळे लागवड उशिरा झाली होती. आता कापणी सुरू होताच पुन्हा पावसाचा अडथळा उभा राहिल्याने शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरले आहे, त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्याती वातावरण ढगाळ असून दुपारनंतर पावसाच्या सरी कोसळत आहेत.

पीक हाता-तोंडाशी आले असताना अवकाळी पाऊस सुरू झाला आहे. हा पाऊस गेल्या आठ नऊ दिवसांपासून सुरू राहिल्याने मोठे नुकसान झाले असून हातातोंडाशी आलेले पीक वाया जात असल्याने पूर्ण मेहनतीवर पाणी फिरले आहे. त्याचा मोठा परिणाम भात शेतीवर होऊ लागला आहे. जर पावसाचे सत्र असेच सुरू राहिले तर जे काही उत्पादन निघाले आहे ते सुद्धा वाया जाईल. विशेषत: रायगड आणि कोकणासह अनेक भागांत विखुरलेल्या परतीच्या पावसाने कापणीसाठी तयार ठेवलेले धान भिजून चिखलात बसले आहे. त्यामुळे बळीराजाच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेण्याची शक्यता नाही तर एकूणच हिरावला गेला आहे.

लोकसंसद

मोबाईलच्या कर्णकर्कश आवाजाला कारवाईचा चाप!

अतिप्रचंड गर्दीमुळे एकीकडे मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या 'लोकल ट्रेन'मधील प्रवास आज सर्वसामान्य मुंबईकरांसाठी एक मोठे दिव्य आणि जीवघेणी कसरत बनला असताना त्यात आता मोबाईलवर मोठ्या आवाजात गाणी ऐकणाऱ्या, व्हिडिओ आणि रील्स पाहणाऱ्या तसेच फोन स्पीकरवर ठेवून मोठमोठ्याने गप्पा मारणाऱ्या उपद्रवी प्रवाशांची भर पडली आहे. रेल्वे प्रवासाने आधीच पिचलेल्या प्रवाशांना या कर्णकर्कश आवाजामुळे प्रचंड मनस्तापाला सामोरे जावे लागते. या आवाजामुळे डोकेदुखी, चिडचिड आणि मानसिक तणाव वाढतो. विशेषत: वृद्ध, आजारी व्यक्ती आणि लहान मुलांना या गोंगाटाचा मोठा त्रास सहन करावा लागतो. अशा उपद्रवी लोकांना मोबाईल वापरताना हेडफोन किंवा इयरफोन वापरण्याचे साधे सौजन्यही नसावे याचे आश्चर्य वाटते. या वाढत्या त्रासाची दखल घेत मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वे प्रशासनाने लोकल गाड्यांमध्ये इयरफोनशिवाय मोठ्या आवाजात गाणी ऐकणाऱ्या, सोशल मीडिया रील्स पाहणाऱ्या आणि स्पीकरवर बोलणाऱ्या प्रवाशांवर रेल्वे कायद्याच्या कलम १४५ अंतर्गत कडक दंडात्मक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. रेल्वे प्रशासनाचे हे पाऊल नक्कीच कौतुकास्पद आणि प्रवाशांना दिलासा देणारे आहे. मात्र ही कारवाई केवळ काही काळापुरती मर्यादित न राहता सतत सुरू राहणे गरजेचे आहे. तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही सर्वांसाठी आहे याचे भान प्रत्येक रेल्वे प्रवाशाने ठेवले पाहिजे.

-प्रदीप अनुसया शंकर मोरे

दिनविशेष

सशस्त्र क्रांतीचे जनक-क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील आद्य क्रांतिकारक आणि सशस्त्र क्रांतीचे जनक वंदनीय वासुदेव बळवंत फडके यांना जयंती दिनानिमित्त विनम्र अभिवादन अन् त्रिवार मानाचा मुजरा!

थोर क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचा जन्म ४ नोव्हेंबर १८४५ रोजी रायगड जिल्ह्यातील शिरढोणे येथे झाला अन् जणू स्वातंत्र्य लढ्याला प्रकाशमान करणारा क्रांतिसूर्य उदयास आला. तथापि, त्यांचे मुळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातले केळशी होत. वासुदेव बळवंत फडके यांचे आजोबा कर्नाळा किल्ल्याचे किल्लेदार होते. त्यामुळे त्यांच्या रक्ताच्या कणा कणात देशभक्ती भिनली होती. उल्लेखनीय गोष्ट म्हणजे क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके हे दत्त उपासक होते. इतकेच नव्हे तर, त्यांनी दत्त महात्म्य हा सात हजार ओव्यांचा ग्रंथ लिहिला. याशिवाय स्वामी समर्थ महाराज यांचेही ते निस्सिम भक्त होते. वासुदेव बळवंत फडके यांच्या मनावर क्रांतिवीर लहुजी उस्ताद साळवे अन् क्रांतिवीर उमाजी नाईक यांच्या देशभक्तीपर विचारांचा मोठा पगडा होता. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत, त्यांच्या गनिमी कावा रणनीतीचा प्रभावीपणे अवलंब करत वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटिशांना जेरीस आणले. ब्रिटिश राजवटीविरुद्ध प्रभावी जनमत उभे करण्याच्या उद्देशाने क्रांतिवीर वासुदेव फडके यांनी ऐक्यवर्धिनी सभा आणि पुणे नेटिव्ह इन्स्टिट्यूटची स्थापना केली. सन १८७६-७७ मध्ये भीषण दुष्काळ पडला असता, शेतकऱ्यांची दयनीय अवस्था पाहून अन् त्याकडे ब्रिटिश सरकारने अक्षम्य दुर्लक्ष केल्याने क्रांतिवीर वासुदेव फडके यांच्या मनात फिरंग्यांबद्दल प्रचंड चीड निर्माण झाली. पुढे त्यांनी जुलुमी ब्रिटिश सत्तेविरुद्ध सशस्त्र क्रांतीचा लढा पुकारला. ब्रिटिश राजवटीला उलथवून टाकण्यासाठी क्रांतिवीर फडके यांनी रामोशी, कोळी, भिल्ल, डांगर यासारख्या मागास व आदिवासी जमातीतील तरुणांना एकसंध करून लष्करी दल उभारले. त्यात दौलतराव नाईक हे त्यांचे प्रमुख विश्वासू सहकारी होते. आपल्या स्वातंत्र्य लढ्याला अधिक बळ मिळावे, यासाठी वासुदेव फडके यांनी हैद्राबाद संस्थानात जाऊन अरब अन् रोहिल्यांची मदत मिळविण्याचा घाट घातला होता. आपल्या लष्करी दलाकरिता पैसा उभारण्यासाठी क्रांतिकारक वासुदेव फडके व त्यांचे लष्करी दल हे ब्रिटिश सरकारी तिजोरीवर व तत्कालिन जुलुमी सावकारांवर गनिमी काव्याने सशस्त्र हल्ले करून त्यांचे खजाने लुटत असत. इतकेच नव्हे तर, लूटलेला पैसा ते दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीसाठीदेखील वापरायचे. त्यांचे मुख्य लक्ष्य म्हणजे ब्रिटिश सरकारची दळणवळणाची यंत्रणा अर्थातच रेल्वे, तार यंत्रणा(टेलिग्राफ), टपाल-कचेऱ्यांना उद्ध्वस्त करून संपूर्ण नाकेबंदी करण्याचे असायचे. 'गोली का जवाब गोली सेफ ही त्यांची युद्धनीति होती. पुणे जिल्ह्यातील लोणीकंद येथे त्यांनी बंडखोरांचे मुख्यालय स्थापन केले होते. भारतभूमीला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी आपल्या जीवनाची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांना आम्ही भारतीय त्रिवार वंदन करतो. मित्रहो, एक काळा दिवस उजाडला अन् त्या दिवशी महान क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांची ब्रिटिश अधिकारी मेजर डॅनियल यांनी साफळा रचून घातपात करत फितुरीच्या मदतीने २० जुलै १८७९ रोजी पंढरपूर जवळील कळदगी येथे निद्रावस्थेत असताना धरपकड केली. त्यांना पुढे विविध गुन्ह्यांखाली ब्रिटिश कोर्टाकडून जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. थोर क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांना येमेनमधील ॲडन (अंदमान) तुरुंगात रवाना करण्यात आले. तेथे त्यांचा अतोनात शारीरिक छळ करण्यात आला. इतकेच नव्हे तर, त्यांनी बंदिवासात स्वत:हून अन

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

४ नोव्हेंबर

१) श्री.रविंद्र गजानन लोंढे
विद्यानगर, अलिबाग,
दि.४-११-१९५२



कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

अनधिकृत बॅनरबाजीचा सुळसुळाट

■ ३२० बॅनर्स जप्त करूनही दंड वसुली निरंक ■ शासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह

। पनवेल । प्रतिनिधी ।

गणेशोत्सव आणि दहीहंडीच्या काळात पनवेल शहरात राजकीय नेते, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध मंडळांकडून मोठ्या प्रमाणावर शुभेच्छांचे फ्लेक्स, बॅनर्स आणि जाहिरात कमानी उभारण्यात आल्या. मात्र, यापैकी एकाही जाहिरात फलकाला अधिकृत परवानगी देण्यात आली नसल्याचा धक्कादायक खुलासा माहिती अधिकारातून झाला आहे. विशेष म्हणजे, महापालिकेने तब्बल ३२० अनधिकृत बॅनर्स जप्त केल्याची नोंद दिली असली, तरी दंड वसुलीचा तपशील मात्र निरंक असल्याचे स्पष्ट केले आहे. अनधिकृत बॅनर्सवर कारवाई का केली जात नाही, याची कारणमीमांसा मागितली असता संबंधित माहिती प्रश्नार्थक स्वरूपाची असल्याचे सांगत प्रशासनाने उत्तर देण्यास असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे पनवेल महापालिकेच्या जाहिरात नियंत्रण आणि अंमलबजावणी यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



दंडात्मक कारवाईचा तपशील शून्य

महापालिकेने अनधिकृत फ्लेक्स आणि बॅनर्सविरोधात केलेल्या कारवाईच्या उत्तरात तब्बल ३२० बॅनर्स जप्त केल्याची माहिती दिली आहे. यावरून प्रशासनाने काही प्रमाणात कारवाई केली होती, हे स्पष्ट होते. मात्र, एवढे बॅनर्स जप्त करूनही दंड वसुलीचा तपशील निरंक असल्याचे उत्तर देण्यात आले आहे.

सजग नागरिक मंच, नवी मुंबईच्या वतीने मंचाचे उपाध्यक्ष अरुण कागले यांनी २८ सप्टेंबर रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज दाखल केला होता. दहीहंडी आणि गणेशोत्सव २०२६ या कालावधीतील प्रभागनिहाय जाहिरात परवानग्या, त्यातून मिळालेला महसूल, अनधिकृत बॅनर्सवरील कारवाई, दंड वसुली, लागू नियमावली आणि बॅनर्स हटविण्यासाठी झालेला खर्च अशा सात मुद्द्यांवर माहिती मागविण्यात आली होती. त्यावर पनवेल महापालिकेच्या प्रभाग समिती अच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या लेखी उत्तरातून प्रशासनाच्या कार्यपद्धतीतील अनेक विसंगती समोर आल्या आहेत.

महापालिकेच्या अधिकृत उत्तरानुसार, दहीहंडी आणि गणेशोत्सवाच्या काळात फ्लेक्स, बॅनर्स आणि जाहिरात कमानी उभारण्यासाठी प्राप्त अर्जांची संख्या तसेच मंजूर अर्जांची संख्या निरंक आहे. त्याचप्रमाणे जाहिरात परवानगीपोटी जमा झालेले शुल्क आणि अनामत रक्कम यांचाही तपशील निरंक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

याचा अर्थ संबंधित कालावधीत एकाही जाहिरात फलकाला अधिकृत परवानगी देण्यात आलेली नसल्याचे महापालिकेच्या उत्तरातून स्पष्ट होते. मग उभारलेले फलक कोणाच्या परवानगीने उभारण्यात आले? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

> **सामान्य नागरिकांना नियम कायदे दाखवणारे प्रशासन फुकटच्या राजकीय जाहिरातबाजी बाबत बोटचेपे धोरण राबवत असल्याने पालिकेचा कारभार हा लोकप्रतिनिधींच्या हातातील कळसूत्री बाहुलीप्रमाणे चालू असल्याचे दिसते. भ्रष्ट प्रशासन कधीच निर्भीडपणे नियम कायद्याची अंमलबजावणी करू शकत नाही याची प्रचिती पनवेल महानगरपालिकेच्या कारभारातून येत आहे.**
> **– अरुण कागले, उपाध्यक्ष, सजग नागरिक मंच नवी मुंबई**

अवकाळी पावसाचा ससेमिरा कायम

■ शेतात कापून ठेवलेल्या धानात पाणी

। कोलाड । प्रतिनिधी ।

मागील चार-पाच वर्षांपासून वेळी अवेळी पडणाऱ्या अवकाळी पावसाचा ससेमिरा आता कायमच सर्वांच्या पाठीशी लागल्याने शेतकरी वर्ग अधिकच धास्तावला आहेत. कारण शेतात कापून ठेवलेल्या धानात पाणीच पाणी झाल्यामुळे शेतकऱ्यांना अधिकच नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.

शनिवार ३१ ऑक्टोबरपासून दोन दिवस ढगाळ वातावरण व जाणवत असलेली कमालीची उष्णता अशा परिस्थितीत कोणत्याही वेळी पाऊस पडेल असा जाणकार मंडळींनी अंदाज बांधला होता. त्याची प्रचिती रविवारी (दि.१) मध्यरात्रीच्या सुमारास आली. आकाशात एकाकी ढग जमा झाल्याने संपूर्ण रोहा तालुक्याला अवकाळी पावसाने झोडपून काढले. याचा फटका शेतकरी वर्गाला मोठया प्रमाणात सोसावा लागत आहे.



यावर्षी हस्त नक्षत्रपासून दीड महिना परतीचा पाऊस बरसला नाही. यामुळे ६० टक्के भात पिकाला लोंबी आल्या नसल्यामुळे शेतकऱ्यांचे आधीच मोठे नुकसान झाले आहे. तर उरला सुरलेला कापून ठेवलेला भात, भाताच्या मळण्या व पेंढ्याच्या गंज्यामध्ये रविवारी रात्री कोसळलेल्या अवकाळी पावसामुळे पाणी गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे अन्नधान्य, बी-बियाणे यासह गुरांच्या चाऱ्याचा देखील प्रश्न शेतकरी वर्गाला सतावणार आहे.

लाच घेताना महावितरणचा कार्यकारी अभियंता ताब्यात

मुंबई : भांडुप येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने महावितरणच्या एका कार्यकारी अभियंत्याला सोमवारी (दि.२) ५० हजार रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडले. सरकारी कामांची थकीत बिले मंजूर करण्याच्या बदल्यात या अधिकाऱ्याने लाचेची मागणी केली होती. देवेंद्र गिलुरकर असे अटक करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव असून, तो भांडुप येथील महावितरणच्या नागरी विभागात कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत आहे. तक्रारदाराने या वर्षी जून महिन्यापासून काही सरकारी नागरी कामे पूर्ण केली होती, ज्यांची सुमारे २१ लाख रुपयांची बिले प्रलंबित होती. ही बिले मंजूर करून घेण्यासाठी आरोपी गिलुरकरने १ लाख ८० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. याबाबत तक्रारदाराने २६ ऑक्टोबर रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली असता एसीबीने या प्रकरणाचा तपास सुरू केला. ३० ऑक्टोबर रोजी पडताळणीदरम्यान, आरोपी अधिकाऱ्याने १ लाख ८० हजार रुपयांच्या लाचेची मागणी कायम ठेवली. त्यापैकी पहिला हप्ता म्हणून ५० हजार रुपये देण्यास सांगितले. या माहितीच्या आधारे, एसीबीने सापळा रचत कार्यकारी अभियंत्याला तक्रारदाराकडून ५० हजार रुपये घेताना रंगेहात पकडले.

अक्षय ओव्हाळ यांना पुरस्कार प्रदान

कोलाड : रोहा तालुक्यातील आंबेवाडी बाजारपेठेतील संजय गांधी नगर येथील अक्षय ओव्हाळ यांना राज्यस्तरीय आदर्श किर्तनरत्न महाराष्ट्र गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

अक्षय ओव्हाळ यांचा हरिपाठ, प्रवचन, किर्तन अशा विविध क्षेत्रात नेहमीच निस्वार्थीपणे सहभाग असतो. याशिवाय रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील असंख्य जिल्ह्यात त्यांची किर्तन व प्रवचनसेवा सुरु आहे. तसेच संजय गांधीनगर येथील छोट्या वस्तीतील अनेक वर्षांपासून सुरु असणारा हरीनाम सप्ताह त्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. युवा किर्तनकार अक्षय ओव्हाळ यांनी किर्तन क्षेत्रात केलेल्या अमूल्य योगदानामुळे समाजपुढे एक आदर्श निर्माण केला आहे. याची दखल घेत त्यांना राष्ट्रभक्ती परिवार, ग्रेट पिपल सोशल फाऊंडेशनतर्फे पुणे येथे राष्ट्रभक्ती महिला संघटना प्रदेशाध्यक्षा भारती तुपे, ग्रेट पिपल सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा प्रियंका आबनावे, राष्ट्रभक्ती परिवार अध्यक्ष सुनिल गोरे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



दीनानाथ पाटील यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

। खरोशी । प्रतिनिधी ।

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक आणि कवी दीनानाथ वेदू पाटील यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त सहस्रचंद्रदर्शन सोहळा, तसेच 'श्री सदगुरू या प्रथम काव्यसंग्रहाचे प्रकाशन आणि भव्य कवी संमेलन आयोजित करण्यात आले होते. हा सोहळा रविवारी (दि.१) पेण येथील म्हाडा कॉलनीतील लक्ष्मी नारायण बँक्वेट एसी हॉल येथे उत्साहात पार पडला. या सोहळ्याला कवी दीनानाथ पाटील यांचे आप्तेष्ट, नातेवाईक, मित्रपरिवार, साहित्यिक, कवी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



प्रारंभी धार्मिक विधी पार पडल्यानंतर ज्येष्ठ कवी दीनानाथ पाटील यांची मिठाई आणि पुस्तकांनी तुला करण्यात आली. या अनोख्या उपक्रमातून साहित्या विषयीची आत्मीयता आणि ज्ञानदानाचा संदेश देण्यात आला. यानंतर कवी संमेलनाला सुरुवात झाली. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी अंबरनाथ येथील ज्ञानामृत विद्यालयाचे माजी प्रा. किसन बराडे होते. कार्यक्रमाची सुरुवात सुगंधा पाटील यांनी सादर केलेल्या ईशस्तवनाने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षदा म्हात्रे यांनी केले.

या सोहळ्यात ज्येष्ठ कवी दीनानाथ पाटील यांच्या 'श्री सदगुरू' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अनेक साहित्यिक आणि मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली. या कवी संमेलनात सुमारे ५२ कवींनी सहभाग घेतला. विविध विषयांवरील कविता आणि काव्यरचनांनी संमेलनात साहित्यिक वातावरण निर्माण केले.



वेदक महाविद्यालयात गुणवंतांचा सत्कार

तळा : गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठान संचलित जी.एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथे महाविद्यालयाच्या स्टाफ कमिटीतर्फे विविध प्रतिष्ठित पुरस्कारप्राप्त मान्यवरांचा सोमवारी (दि.२) सत्कार करण्यात आला. यावेळी पुरुषोत्तम मुळे यांना माणगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने 'बाळशास्त्री जांभेकर दर्पण पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. प्रा. डॉ.एस.व्ही. बंगाळे यांना कोकण मराठी साहित्य परिषद, तळा शाखेचा 'गुणवंत शिक्षक पुरस्कार २०२६' तसेच 'बेस्ट फॅकल्टी अवॉर्ड इन केमिस्ट्री' प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. तसेच डॉ. एन.एम. शेख आणि प्रा. पल्लवी भट यांना महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेच्या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात 'कोकण विभाग गुणवंत शिक्षक पुरस्कार२०२६' प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

बोर्ली पंचतनमध्ये अतिसाराचा प्रादुर्भाव

। बोर्ली पंचतन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन येथे अतिसाराचा (डायरिया) प्रादुर्भाव वाढला आहे. या पार्श्वभूमीवर बोर्ली पंचतन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने संपूर्ण गावात घरोघरी भेट देत व्यापक आरोग्य तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि आशा सेविकांनी ग्रामस्थांच्या घरी जाऊन त्यांची आरोग्य तपासणी केली. तसेच आवश्यकतेनुसार रक्ताचे नमुने संकलित केले.



या परिस्थितीची दखल घेत अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयेश गोसावी यांनी बोर्ली पंचतन येथे भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी तालुका आरोग्य अधिकारी, आरोग्य विस्तार अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांच्यासह प्राथमिक आरोग्य केंद्राला तसेच अतिसाराचा प्रादुर्भाव झालेल्या रुग्णांच्या घरी भेट देऊन त्यांच्या प्रकृतीची व उपचारांची माहिती घेतली.

आरोग्य विभागाची घरोघरी तपासणी

त्याचबरोबर गावाला पाणीपुरवठा करणारी पाण्याची टाकी आणि इतर संबंधित ठिकाणांचीही पाहणी केली. आरोग्य यंत्रणेकडून राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांचाही आढावा घेतला.

ग्रामस्थांनी घाबरून न जाता आरोग्य विभागाच्या सूचनांचे पालन करावे. घरोघरी येणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे. कोणताही त्रास जाणवल्यास त्वरित आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

दिवाळी फराळ, जीवनावश्यक साहित्याचे वाटप | श्री सखी प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम

दुर्गम आदिवासी पाड्यांवरील कुटुंबांची दिवाळी गोड

। कळंबोली । प्रतिनिधी ।

शहरांमध्ये दिवाळीचा झगमगाट आणि उत्साह सुरू असताना दुर्गम आदिवासी पाड्यांवरील कुटुंबांच्या आयुष्यातही आनंदाचे क्षण फुलविण्याचा स्तुत्य उपक्रम कामोठे येथील श्री सखी प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात आला. 'आनंदाची ओंजळ' या सामाजिक उपक्रमांतर्गत खालापूर तालुक्यातील उंबरणेवाडी, नवीवाडी, अरकासवाडी आणि पिरकरवाडी येथील सुमारे १३५ आदिवासी कुटुंबांना दिवाळी फराळासह जीवनावश्यक साहित्याचे वाटप करून त्यांच्यासोबत दिवाळीचा आनंद साजरा करण्यात आला.

माथेरानच्या डोंगररांगा आणि पेब किल्ल्याच्या परिसरातील दुर्गम भागात वसलेल्या या आदिवासी वाड्यांमध्ये आजही रस्ते, वीज, शुद्ध पिण्याचे पाणी आणि आरोग्य सुविधांसारख्या मूलभूत सोयींचा अभाव जाणवतो. यामुळे अनेक कुटुंबांना सण-उत्सवांचा आनंदही मनाप्रमाणे साजरा करता येत नाही.

ही परिस्थिती लक्षात घेऊन श्री सखी प्रतिष्ठानच्या संस्थापिका व अध्यक्षा जयश्री सुद्रिक झा यांनी यंदाची दिवाळी या आदिवासी बांधवांसोबत साजरी करण्याचा संकल्प केला.

या उपक्रमांतर्गत प्रत्येक कुटुंबाला रवा, साखर, मैदा आणि चणाडाळ प्रत्येकी एक किलो, खाद्यतेल एक लिटर, सुगंधी उटणे, मोती साबण, पणत्या आणि मिठाई अशा साहित्याचे वाटप करण्यात आले.



रोजगाराच्या संधींसह आरोग्य शिबिराचे नियोजन

या भेटीदरम्यान अध्यक्षा जयश्री सुद्रिक झा यांनी आदिवासी कुटुंबांच्या दीर्घकालीन गरजांकडेही लक्ष देण्याचा संस्थेचा मानस व्यक्त केला. स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणे तसेच या भागात आरोग्य शिबीर आयोजित करण्याच्या दृष्टीने पुढाकार घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे 'आनंदाची ओंजळ' हा उपक्रम एका दिवसाच्या मदतीपलीकडे जाऊन आदिवासी बांधवांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल ठरण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

निवडक



वेदक विद्यामंदिरची डिजिटल क्रांती

तळा : तळा विभाग शिक्षण प्रसारक मंडळ तळा, जिल्हा रायगड यांच्या वतीने शिक्षण क्षेत्रात एक ऐतिहासिक आणि क्रांतिकारी पाऊल उचलण्यात आले आहे. मंडळाच्या श्री. गोपीनाथ महादेव वेदक विद्यामंदिर व कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा येथील सर्व वर्गखोल्या डिजिटलायझेशन करण्यात आल्या आहेत. या संपूर्ण शाळा डिजिटलायझेशनचे उद्घाटन महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी त्यांनी मार्गदर्शनात सांगितले की, पालक आपल्या मुलाला शाळेत टाकताना त्या शाळेत आधुनिक शिक्षण पद्धत व सर्वसोयी उपलब्ध असाव्यात याची अपेक्षा असते. आणि आज गो.म.वेदक विद्यामंदिर या संपूर्ण शाळेचे डिजिटलाइझेशन झाल्यामुळे पालकांची आपल्या मुलांना आधुनिक शिक्षण देण्याची चिंता मिटली आहे. डिजिटलायझेशनमुळे तळ्यातील विद्यार्थ्यांना आता आधुनिक, स्मार्ट आणि दर्जेदार शिक्षण मिळून ग्रामीण भागातील शिक्षणात नवा अध्याय सुरू होणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. याप्रसंगी शासकीय अधिकारी, सर्वपक्षीय पदाधिकारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



विद्यार्थ्यांना पिटी गणवेशाचे वाटप

खरोशी : पेण तालुक्यातील दुर्गम भागातील खौसा या आदिवासी वाडीतील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना पिटी गणवेशाचे वाटप करण्यात आले. गडब गावचे सुपुत्र निलेश केशव कोठेकर यांनी त्यांची मुलगी नित्या कोठेकर हिच्या नावाने शालेय विद्यार्थ्यांना पिटी गणवेशाचे वाटप केले. यावेळी निलेश कोठेकरांनी आपल्या मनोगतांमध्ये विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले आणि अशा वंचित घटकांना त्यांच्याकडून अल्पशी मदत झाली याबद्दल समाधान व्यक्त केले. तर सुरेंद्र गावंड यांनी शाळा, विद्यार्थी व सुंदर व शांत शालेय परिसर पाहून कौतुक केले. पिटी गणवेश मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले होते. शेवटी शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, पालक यांच्याकडून उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त करून सांगता करण्यात आली.



शिवतेज मंडळातर्फे नेत्र तपासणी शिबीर

पाली/गोमाशी : क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या शिवतेज क्रीडा मंडळ-पाच्छापूर या मंडळाने सामाजिक बांधिलकी जपत वैद्यकीय क्षेत्रातही पाऊल टाकले आहे. मंडळ गेली अनेक वर्षे क्रिकेट स्पर्धांचे आयोजन व प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप असे उपक्रम राबवत आहे. पाली येथील श्री बल्लाळेश्वर देवस्थान व लालचंद रोहरा लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या सहकार्याने सोमवारी (दि.२) सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत पाच्छापूर येथील श्री सोमजाई मंदिरात मोफत नेत्र तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच पाच्छापूर परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. एकूण १५६ जणांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यापैकी सहा रुग्णांना मोतीबिंदू असल्याचे निदान झाले. त्यांच्यावर पनवेल येथील लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टच्या हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. तर २१ रुग्णांना पुढील तपासणीसाठी पाली येथील हॉस्पिटलमध्ये बोलावण्यात आले आहे. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टचे शिबीर संयोजक दत्ता ठाकूर, सोनिया माळी, अनिकेत, निशांत तांबट, प्राथमिक व माध्यमिक शाळेचे विद्यार्थी, शिक्षकवृंद तसेच शिवतेज क्रीडा मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सभासदांनी विशेष परिश्रम घेतले.



डॉ.आशा कोकणे यांना पुरस्कार प्रदान

रसायनी : शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉ. आशा विजय कोकणे यांना 'आवाज महा-मुंबईचा द्वितीय वर्धापन दिन विशेष गौरव पुरस्कार २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. रविवारी (दि.१) पनवेल येथील नील हॉस्पिटलच्या मेडिटेशन हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या समाजकार्याबरोबरच वारली चित्रकलेच्या माध्यमातून प्राचीन भारतीय हस्तकला आणि संस्कृतीचे जतन, संवर्धन व प्रचार-प्रसार करण्यासाठी केलेल्या योगदानाची यावेळी विशेष दखल घेण्यात आली. वारली चित्रकलेच्या माध्यमातून महाराष्ट्राची आणि भारताची प्राचीन संस्कृती देश-विदेशात पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले आहे. विविध प्रकारच्या नैसर्गिक माध्यमांवर त्यांनी १५०० हून अधिक वारली चित्रांच्या डिझाइन्स तयार केल्या आहेत. त्यांच्या या संशोधनात्मक आणि कलात्मक कार्याची दखल घेत दिल्ली येथील युरो एशियन विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय दीक्षांत समारंभात त्यांना वारली चित्रकला, भारतीय हस्तकला संस्कृतीचे लेखन व संशोधन या कार्यासाठी मानद डॉक्टरेट प्रदान करून सन्मानित करण्यात आले आहे. शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना यापूर्वी 'कोहिनूर राष्ट्रीय पुरस्कार २०२५' प्राप्त झाला आहे.

निवडक

बहुजन आघाडीच्या कार्यालयाचे उद्घाटन



कर्जत : वंचित बहुजन आघाडीच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन पक्षाचे राष्ट्रीय नेते ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते संपन्न झाले. हे जनसंपर्क कार्यालय कर्जत-मुरबाड हायवेवरील राजमुद्रा चौक, कर्जत येथे सुरू करण्यात आले आहे. जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून कर्जत परिसरातील नागरिकांना आपल्या समस्या मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. तसेच पक्षाचे संघटन अधिक मजबूत करून जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्यासाठी हे कार्यालय महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. उद्घाटन प्रसंगी दिपक दादा मोरे, दिपक गायकवाड, धर्मेंद्र मोरे,सुनील गायकवाड, राहुल गायकवाड, प्रदीप ढोले, लोकेश यादव, प्रणेश यादव, प्रदीप गायकवाड, प्रदीप सोनवने, जगदीश गायकवाड, मुकेश गायकवाड, आनंद् खैरे, संजय मोरे, प्रथमेश पवार, पेज्वल गायकवाड, अनिकेत गायकवाड, प्रकाश गायकवाड, वंचित बहुजन आघाडी, भारतीय बौद्ध महासभचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

'फटाके फोडणाऱ्यांनी नियमांचे पालन करा'

महाड: दिवाळी आणि सण-उत्सवांच्या काळात ध्वनी व वायुप्रदूषण रोखण्यासाठी महाड नगरपरिषदेने नागरिकांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांच्या अनुषंगाने सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडणे, शांतता क्षेत्रातील नियम आणि ध्वनिवर्धक यंत्रणांच्या वापराबाबत नागरिकांनी नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन नगरपरिषद प्रशासनाने केले आहे. नगरपरिषदेच्या



आवाहनानुसार, सार्वजनिक रस्ते, रस्त्यांच्याकडेला असलेली ठिकाणे, सार्वजनिक ठिकाणी सण-उत्सवांच्या काळात फटाके फोडू नयेत. तसेच न्यायालये, रुग्णालये, शासकीय कार्यालये, इतर शांतता क्षेत्रांमध्ये फटाके फोडण्यास मनाई करण्यात आली आहे. सार्वजनिक कार्यक्रम, मिरवणुका किंवा अन्य कार्यक्रमांमध्ये ध्वनिवर्धक यंत्रणांचा वापर करण्यासाठी परवानगी घेणे बंधनकारक आहे. फटाके आणि ध्वनिवर्धक यंत्रणांमुळे ध्वनीप्रदूषणासह वायुप्रदूषणही वाढू शकते. याचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याने पर्यावरणपूरक पद्धतीने सण-उत्सव साजरे करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र टायगर ग्रुपतर्फे रक्तदान शिबीर

चिरनेर : महाराष्ट्र टायगर ग्रुपचे अध्यक्ष तानाजी जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र टायगर ग्रुप रॉकस्टार उरण विभागाचे अध्यक्ष रवी भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली कोप्रोली येथे सोमवारी (दि.२) महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रक्तदान शिबिराचे उद्घाटन निलेश चव्हाण व विराज पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. रक्तदान शिबिरात नंदकुमार म्हात्रे यांच्यासह ४० रक्तदात्यांनी रक्तदान केले. टायगर ग्रुपच्या कार्यकर्त्यांनी रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

पनवेलमध्ये 'वोट बचाओ' अभियान



पनवेल : भारतीय लोकशाही, संविधान आणि प्रत्येक नागरिकाच्या मतदानाच्या अधिकाराच्या संरक्षणासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने देशभरात 'वोट बचाओ, देश बचाओ' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून मतदार याद्यांमधील पारदर्शकता, निवडणूक प्रक्रियेतील निष्पक्षता आणि नागरिकांच्या मतदानाच्या अधिकाराबाबत जनजागृती केली जात आहे. या अभियानाच्या अनुषंगाने बुधवारी सायंकाळी काँग्रेस भवन, पनवेल येथे एका विशेष पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा डॉ. श्रुती म्हात्रे आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सर्व विभाग व सेल समन्वयक समिती प्रमुख शाह आलम शेख आणि नगरसेवक हरीश केणी यांच्या मार्गदर्शनाखाली ही पत्रकार परिषद पार पडली. मवोट बचाओ, देश बचाओफ अभियानांतर्गत पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने नावडे, तळोजा, खारघर, कामोठे, नवीन पनवेल आणि खांदा कॉलनी या सहा प्रमुख परिसरांमध्ये संविधान पदयात्रांचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रांमध्ये काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. संविधानांचे महत्त्व, लोकशाही मूल्यांचे संरक्षण, मतदार याद्यांमधील पारदर्शकता आणि प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाचा अधिकार मिळावा, याबाबत या पदयात्रांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात आली. या पत्रकार परिषदेचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते व सचिव अजय पांडुरंग कापरे यांनी केले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy in Office Education- Bsc/ Bcom, Salary - 15000 Per month, Location - Bamansure, Contacat- 9823585321
- Vacancy in Furniture Showroom Education- Bsc/Bcom, Experience -2 Years, Salary - 20,000 Per month, Location - Zirad, Contacat- 9823585321
- दुकानगाळा भाड्याने देणे आहे. विक्री करणे आहे. २० गुंठे जागा अलिबागपासून २ किमीवर ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

रोहित्र चोरीची ग्रामस्थांना शिक्षा

■ सुकेवाडी सात महिने अंधारात

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील खांडस जवळील सुकेवाडी येथील आदिवासी वाडीतील वीज रोहित्र चोरीला गेले आहे. महावितरण कंपनीकडून तेथे वीज पुरवठा व्हावा यासाठी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जात नाही. त्यामुळे गेली सात महिने सुकेवाडी येथील ग्रामस्थ अंधारात आहेत.

खांडस बेलाची वाडी रस्त्यालगत असलेल्या सुकेवाडी या आदिवासी वाडीमध्ये राहणाऱ्या आदिवासी लोकांना गेल्या सात महिन्यापासून विजेविना राहावे लागत आहे.तेथे वीज पुरवठा करणारा वीज रोहित्र चोरीला गेले असून वीज पुरवठा पूर्ववत करण्याचे काम महावितरणाकडून केले गेले नाही. त्याचा परिणाम तेथे वीज पुरवठा सुरू झालेला नाही. स्थानिक आदिवासी लोकांनी वीज पुरवठा व्हावा आणि वीज पुन्हा आपल्या घरात सुरू व्हावी यासाठी महावितरणच्या कशेळे



येथील सहायक अभियंता कार्यालयात जाऊन तक्रार केली.

वीजपुरवठा खंडित होण्याची भीती

अतिदुर्गम भागात असलेल्या या रोहित्रामधील चोरीमुळे परिसरात वीजपुरवठा खंडित होण्याची भीती स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे. रोहित्र सुरक्षेबाबत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

मात्र, चार महिने झाले तरी महावितरणाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. तर आज सात महिने होऊन गेले तरी नवीन वीज रोहित्र आणून बसवण्यात आले नाही आणि त्यामुळे ही आदिवासी वाडी अंधारात आहे.

स्थानिक ग्रामस्थांनी वीज पुरवठा करणारे वीज रोहित्र बंद पडल्यानंतर महावितरण कंपनीकडे आपली तक्रार केली होती. मात्र, महावितरणाकडून बंद पडलेल्या वीज रोहित यांची दुरुस्ती करण्याची कार्यवाही केली नाही आणि त्याचा फायदा चोरट्यांनी घेतली. आदिवासी वाडीमधील वीज खंडित झाल्याने अंधाराचा फायदा घेऊन वीज रोहित्र चोरून नेण्याची करामत चोरट्यांनी केल्याने आदिवासी लोक अंधारात आहेत. तर महावितरणाकडून वेळीच वीज रोहित्र दुरुस्तीची कार्यवाही केली नसल्याने स्थानिकांना अंधारात रहावे लागत आहे.

अशा परिस्थितीत वीजपुरवठा बंद राहिल्यामुळे घरगुती कामकाज, पाणीपुरवठा व दैनंदिन उपजीविकेवर मोठा परिणाम झाला आहे. रात्रीच्या अंधारामुळे महिलांमध्ये, लहान मुलांमध्ये व ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वीज नसल्यामुळे रस्ते व घरांच्या परिसरात अंधार पसरल्याने ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

ऑनलाईन फसवणूक

नवीन पनवेल : ऑर्डर केलेल्या कच्च्या मालाकरता जास्त पैसे दिल्याचे भासवून लिंक ओपन करण्यास सांगितली आणि मोबाईल हॅक करून ६३ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाणे येथे (दि.२९) ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील आरोपी डीटीडीसी कस्टमर केअर क्रमांकवरील इसमाने रोडपाली येथील फिर्यादी यांचा विश्वास संपादन केला आणि त्यांनी ऑर्डर केलेल्या कच्च्या मालाकरता जास्तीचे पैसे दिल्याचे भासवले आणि त्यांना व्हाट्सअप वरून लिंक पाठवली व ती लिंक ओपन केली असता फिर्यादी यांचा मोबाईल हॅक झाला आणि त्यांच्या गुगल पे मधील बँक खात्यातून ६३ हजार रुपये रक्कम काढून घेऊन त्यांची फसवणूक केली.

आयटीआयमध्ये राष्ट्रीय एकतेचा जागर



। नागोठणे । प्रतिनिधी ।

आद्य क्रांतिकारी वासुदेव बळवंत फडके शासकीय आयटीआय, नागोठणे येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत ङ्कराष्ट्रीय एकता दिवसफ उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी अधिकारी, कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थींनी देशाची एकता व अखंडता जपण्याची शपथ घेतली. संस्थेचे प्रा. सदाशिव पाटील, एस. एस. भगत यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान. एस. व्ही. केदारी यांनी भूषविले. व्ही. आय. लोंढे यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेच्या पूजा एम. नलगे यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याचा गौरव करत राष्ट्रीय एकात्मता आणि नागरिकांच्या राष्ट्राप्रती कर्तव्यांचे महत्त्व पटवून दिले.

रास्त भाव धान्य दुकानदार आक्रमक

प्रलंबित मागण्यांसाठी शासनदरबारी पाठपुरावा

। पनवेल । प्रतिनिधी ।

रास्त भाव धान्य दुकानदारांच्या विविध समस्या आणि वाढत्या महागाईच्या प्रश्नावर रास्त भाव धान्य दुकान व किरकोळ रॉकेल विक्रेता वेल्फेअर असोसिएशन, पनवेलने आक्रमक भूमिका घेतली आहे. दुकानदारांच्या प्रलंबित मागण्यांची पूर्तता करण्यासाठी शासनदरबारी पाठपुरावा करण्यासह सर्वसामान्य जनतेला महागाईतून दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडे मागणी करण्याचा निर्णय संघटनेच्या बैठकीत घेण्यात आला.

संघटनेचे अध्यक्ष भरत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली (दि.३१) ऑक्टोबर रोजी खांदा कॉलनी, सेक्टर ९ येथील शिवसेना शाखेत ही बैठक पार पडली. यावेळी पनवेल



तालुक्यातील रास्त भाव धान्य दुकानदारांच्या विविध प्रशासकीय व तांत्रिक अडचणी, प्रलंबित मागण्या आणि संघटनात्मक विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

रास्त भाव धान्य दुकानदारांना भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी संबंधित शासकीय विभाग आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे ठोस भूमिका मांडण्याचे बैठकीत निश्चित करण्यात आले. दुकानदारांच्या प्रश्नांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन प्रलंबित मागण्या तातडीने मार्गी लावाव्यात, अशी भूमिका भरत पाटील यांनी मांडली.

दरम्यान, दुष्काळसदृश परिस्थिती आणि वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान कठीण झाले आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढत असल्याने सामान्य कुटुंबांवर आर्थिक ताण येत आहे. त्यामुळे वाढत्या महागाईवर नियंत्रण आणून जनतेला दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडे संघटनेच्या वतीने मागणी करण्यात येणार असल्याचे पाटील यांनी सांगितले.

बैठकीत संघटनेच्या कामकाजाचाही आढावा घेण्यात आला. संघटनेच्या कार्यात वारंवार अनुपस्थित राहणाऱ्या पदाधिकारी व दुकानदारांच्या असहकार्याबाबत चर्चा करून सर्वांनी संघटनात्मक कामात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

दुकानदारांच्या हक्कांचे प्रश्न किंवा महागाईने त्रस्त झालेल्या सर्वसामान्य जनतेचे प्रश्न, या दोन्ही विषयांवर संघटना सातत्याने पाठपुरावा करणार आहे. प्रशासनाने समस्यांची तातडीने दखल घेऊन त्यांचे निराकरण करावे, असा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला.

युनायटेड वेकडून बंधाऱ्यांची दुरुस्ती

। नेरळ । प्रतिनिधी ।

युनायटेड वे मुंबई संस्थेद्वारा जल संजीवनी प्रकल्प कर्जत तालुक्यातील आदिवासी बहूल भागात राबविला जात आहे. खांडस, पाथरज, अंभेरपाडा, नांदगाव, ओलमण आणि वारे ग्रामपंचायत मधील ४३ गावात राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पाचा उद्देश गावांचा सर्वांगीण विकास करणे असून त्यात पिण्यासाठी आणि शेती सिंचनसाठी पाणी उपलब्धता करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यावर भर दिला जात आहे.

तालुक्यातील डोंगरपाडा, अंभेरपाडा, नवसूचीवाडी, ऐनाचीवाडी, चाफेवाडी, पेटारवाडी



येथे रिकाम्या गोण्यांमध्ये माती भरून त्यांचा वापर करून ग्रामस्थांच्या सहभागातून विविध ठिकाणी वनराई बंधारे बांधले आहेत.

युनायटेड वेकडून जलसंजीवनी अभियान राबवण्यात येत असून जलक्रांती झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. या माध्यमातून उन्हाळ्यात कोरड्या असणाऱ्या भागातील नद्यांवर असणारे सिमेंट बंधारे यांची दुरुस्ती करून पाणी अडवण्याचे मोहीम हाती घेतली आहे. दरम्यान, आतापर्यंत सहा सिमेंट बंधाऱ्यात पाणी अडवण्यात आल्याने तेथील शेतकऱ्यांना फायदा झाला आहे.

रत्नप्रभा बेल्हेकर 'नवदुर्गा नारी शक्ती' पुरस्काराने सन्मानित

। अलिबाग । प्रतिनिधी ।

महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी गेल्या २७ वर्षांपासून सातत्याने कार्यरत असलेल्या अलिबाग येथील रत्नप्रभा बेल्हेकर यांना नाशिक येथे आयोजित 'नवदुर्गा नारी शक्ती' या विशेष सोहळ्यात 'नवदुर्गा पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. मराठी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. एमएसएमई, राज्यरत्न मासिक आणि युको बँक यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संपूर्ण महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सन्मान



करण्यात आला.

बेल्हेकर गेल्या २७ वर्षांपासून गरीब आणि गरजू महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत. महाराष्ट्रातील विविध गावांमध्ये जाऊन त्या महिलांना मोफत व्यावसायिक प्रशिक्षण देतात. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे ६ हजार ८०० महिलांना स्वावलंबी होण्याची संधी मिळाली आहे. महिलांना शिलाई मशीनचे वाटप करून त्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे कामही त्या करतात. याशिवाय गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करण्याबरोबरच समाजातील वंचित घटकांना आधार देण्याचे काम त्या सातत्याने करीत आहेत. महिलांच्या हाताला काम देऊन त्यांना स्वावलंबी बनविण्याच्या या सामाजिक योगदानाची दखल घेत त्यांना नवदुर्गा पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्या या सन्मानामुळे अलिबागच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

पोश्री नदीवर श्रमदानातून पाणी अडवले

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात यावर्षी पाऊस कमी झाला आहे,त्यामुळे शेतोपिके धोक्यात आली आहेत. त्यामुळे जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले यांनी नदी नाल्यातील वाहून जाणारे पाणी अडवण्याचे आवाहन केले होते. वनराई बंधारे तसेच नद्यांमधील सिमेंट बंधारे दुरुस्त करून त्यात पाणी अडवण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार तालुक्यात 'पाणी आडवा, पाणी जिरवा'ही संकल्पना प्रत्यक्षात आणत ग्रामपंचायतीमधील बोरगाव येथे उन्हाळ्यात कोरड्या असलेल्या सिमेंट बंधाऱ्यात पाणी अडवण्याचे काम स्थानिकांनी श्रमदान करून केले आहे.

पोश्री नदीवर बोरगाव येथे असलेला सिमेंट बंधाऱ्याच्या झडपा बंद करून आजूबाजूने पाणी वाहून जाऊ नये यासाठी सिमेंटचे रिकाम्या पिशव्या मातीने भरून त्या लावण्यात आल्या. त्याचा फायदा येथे बोरगाव येथे पोश्री नदीमध्ये दीड ते दोन किलोमीटरपर्यंत पाण्याचा मोठा साठा उपलब्ध झाला आहे. या पाण्याचा उपयोग ग्रामस्थांना होणार आहे. भाजीपाला शेतीसाठी या पाण्याचा वापर केला जाणार असल्याने रोजगार देखील निर्माण होणार आहे. तर पुढील सहा महिने त्या सिमेंट बंधाऱ्यात पाणी साठा होणार असल्याने शेती तसेच जनावरे यांचा पाण्याचा प्रश्न देखील सुटला असून स्थानिक नळपाणी योजना देखील सुरळीत चालण्यास मदत होणार आहे.

साई मंदिराचा परिसर झाला अतिक्रमण मुक्त

रस्त्याच्या दुतर्फा गटाराचे बांधकाम

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान-नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्यावरील नेरळ कोल्हारे येथील साई मंदिर परिसरातील रस्त्याच्या आजूबाजूला असलेली बांधकामे रस्त्याच्या कामासाठी दुकानदारांनी स्वतःहून बाजूला केली आहेत. नेरळ कळंब हा रस्ता सिमेंट काँक्रीटचा बनवला जात असून या रस्त्यासाठी स्थानिक रहिवाशी अमर मिसाळ यांनी आवाहन केल्यानंतर रस्त्यापासून काही मीटर अंतर सोडून रस्ता बसविण्यासाठी तेथील दुकानदार यांनी तेथील अतिक्रमणे बाजूला केली आहेत. दरम्यान आता रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी गटार बांधण्याचे काम हाती घेतले असून कामे वेगाने सुरू असल्याने साई मंदिर परिसरातील वाहतूक कोंडी



दूर होण्यास मदत झाली आहे.

माथेरान-नेरळ कळंब या राज्यमार्ग रस्त्यावर सिमेंट काँक्रीटीकरण करण्यासाठी एमएमआयडीसीकडून काम सुरु आहे. मात्र, नेरळ साई मंदिर भागातील रस्त्यावरील अतिक्रमणे यामुळे रस्त्याचे दुतर्फा संरक्षण भिंती आणि गटार बांधण्यात अडचणी निर्माण होत हीत्या. त्यामुळे गेली काही महिने या रस्त्याचे काम पुढे जात नव्हते. या भागातील कार्यकर्ते अमर मिसाळ यांनी रस्त्याच्या आजूबाजूला दुकान व्यवसाय करणाऱ्या स्थानिकांची बैठक घेऊन सर्वांनी आपली अतिक्रमणे काही मीटर मागे घेण्याची सूचना केली. त्यामुळे जागेचे मालक असलेले सार्वजनिक बांधकाम विभागाला अतिक्रमण काढून टाकण्यासाठी कोणत्याही प्रकारची कारवाई करावी लागली नाही.

> साई मंदिर येथील दुकानदार हे स्थानिक आहेत. सर्व दुकानदार यांना एकत्र बसून विश्वासात घेतले आणि स्थानिक दुकानदारांनी सर्व अतिक्रमणे स्वतःहून बाजूला केल्याने सर्व प्रश्न मिटला आहे. – अमर मिसाळ, माजी सभापती

महिला गृहउद्योजिकांचे अर्थकारण कोलमडले | **रेडीमेड फराळ खरेदी करण्याकडे नागरिकांचा कल**

दिवाळी फराळावर महागाईचे सावट

। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।

दिवाळी म्हणजे दिव्यांची रोषणाई,खमंगफराळाचीमोठीरेलचेल असते. आताच्या धावपळीच्या जगात गृहिणींना दिवाळी फराळ बनवायला वेळ मिळत नाही. त्यामुळे तयार फराळाला गृहिणींची पसंती मिळते. परंतु या वर्षी महागाईची झळ तयार फराळालाही बसली आहे. यंदा रेडीमेड फराळ खरेदी करण्याकडे नागरिकांचा कल वाढला आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर फराळ बनवून विकणाऱ्यांची दिवाळी फराळ बनवून विकण्याची लगबग सुरू झालेली आहे.

महागाईचे सावट सध्या घरगुती महिला उद्योजिका आणि लघु



व्यावसायिकांसमोर उभे ठाकले आहे. अवघ्या काही दिवसांवर आलेल्या दिवाळीच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांच्या स्वागतासाठी फराळ तयार करण्याची लगबग सुरू असतानाच, महागाईच्या भडक्याने या व्यवसायाचे अर्थकारण पूर्णपणे कोलमडले आहे.

सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये तब्बल ४० जीवनावश्यक वस्तूंच्या दरामध्ये मोठी वाढ झाली आहे. या वाढत्या किमतींमुळे घरगुती फराळ तयार करून आपला संसार चालवणाऱ्या महिला उद्योजिकांसमोर मोठे संकट निर्माण झाले आहे.

चकली, लाडू, शेव, चिवडा यांसारख्या पारंपरिक दिवाळी फराळाच्या एकूण उत्पादनात अंदाजे ६० टक्के खर्च केवळ तेल आणि डाळींचाच असतो. मोठ्या प्रमाणावर माल खरेदी करणारे घाऊक व्यापारी किंवा उद्योजक कमी दरात कच्चा माल खरेदी करू शकतात. मात्र, घरगुती महिला उद्योजिकांची खरेदीची मर्यादा कमी असल्याने त्यांना होलसेल बाजारात म्हणावा तसा फायदा मिळत नाही. आधीच वाढलेले भाव आणि उद्या त्यात आणखी वाढ होण्याचा धोका अशा कात्रीत व्यावसायिक सापडले आहेत.

> घरगुती फराळ उत्पादक आरोग्याची काळजी घेऊन आपल्या ग्राहकांसाठी दर्जेदार मालाचा वापर करतात. मात्र, महागाई वाढल्याने उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत आहे. त्यामुळे ग्राहक व उत्पन्न टिकवण्याचे मोठे आव्हान आहे. -प्राची साठे-गोळे, गृहउद्योजिका

खोपटा पूलावर वाहतुकीचे बेशिस्त दर्शन

उरण : नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षाचालकांवर कडक आणि सातत्यपूर्ण दंडात्मक कारवाई न झाल्यामुळे त्यांची मुजोरी उरण तालुक्यात वाढत आहे. त्यात अशा रिक्षाचालकांच्या मनमानीमुळे खोपटा पूलावर वाहतुकीचे बेशिस्त दर्शन सातत्याने पाहायला मिळत आहे. त्यामुळे त्याचा नाहक त्रास हा प्रवाशी नागरिक, रुग्ण, विद्यार्थी यांना सहन करावा लागत आहे. तरी वाहतूक विभाग, आरटीओ अधिकाऱ्यांनी अशा बेशिस्त, वाहतूक कोंडीला जबाबदार असणाऱ्या रिक्षा चालकांवर कारवाईचा बडगा उगारावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

उरण तालुक्यात २५ टक्के बेरोजगार तरुणांनी आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी महाराष्ट्र मोटार वाहन नियमांनुसार, व्यावसायिक वाहन चालकांसाठी रिक्षा परमिट हे आरटीओ कार्यालयातून घेऊन प्रामाणिकपणे आपला दैनंदिन व्यवसाय सुरू केला आहे. तर, २० टक्के तरुणांनी आपल्या नोकरी व्यवसायाला जोडधंदा म्हणून आरटीओ अधिकाऱ्यांच्या डोळ्यात धुळफेक करुन रिक्षा परमिट हे आरटीओ कार्यालयातून प्राप्त करून घेतले असून, प्रशासन आणि वाहतूक पोलिसांच्या कारवाईच्या अभावामुळे त्यांनी आपली मनमानी सुरू केली आहे. त्यात अशा

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे मालेगांव तर्फे कोतलखलाटी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या बिनशेती प्लॉट मिळकतीचे मालक पाल्म पॅराडाईज रियलेटर्स एल एल पी तर्फे भागिदार विश्वास श्रीधर माने व समद हमीद मकानी यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

अ.क्र.	सर्व्हे क्रमांक / भुमापन क्रमांक	क्षेत्रफळ आर.चौ.मी	आकारणी रु.पै.
०१	५८/१२	६.७८ ६७८ चौ.मी.	६७.८०

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून, १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०४ नोव्हेंबर २०२६

ॲड.शरद आर.सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला,
बी विंग, विहंग को.ऑ.हौ.सो.लि. कोतवालनगर
कर्जत ता.कर्जत, जि.रायगड-४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. सरबजिंदर सिंग सुखचैन सिंग संधु, रा. रूम नं. ६१, सहावा मजला, विंडरमेरे २/ए, मेगा मॉल जवळ, अंधेरी (प.), आझाद नगर, मुंबई, ४०००५३, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विदयमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे धामणी, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत -

स.नं.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू.पै.)
२७/१२	०.८१.०० पो.ख. ०.१८.००	०.५०

यापैकी श्री. योगेश मनोहर मांडे व श्री. दिनेश प्रभाकर पिंपरकर यांच्या नावे असलेले ०.३०.०० हे.आर.पॉ. क्षेत्र.

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ०७ (सात) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ०४/११/२०२६.

सही /-
ॲड. उषा जे. कांबळे
कर्जत, ''पुष्प विमल '' निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे.
मो.नं.७३८५००४८०६.

जाहीर प्रगटन

मी खालील सही करणार जाहीर प्रगटन देत आहे की, मी श्रीमती फिलोमिना एस्टीबेइरो, रा. ए/९, जय मंगल मुर्ती सोसायटी, कांजुर व्हिलेज रोड, जस्मीन स्टोअर जवळ, कांजुर मार्ग पुर्व, मुंबई, ४०००४२, यांच्याकडुन त्यांच्या मालकी व ताब्यातील मौजे जामरूंग, ता. कर्जत, जि. येथील बिनशेती सर्व्हे नंबर ११८/४, प्लॉट नं. ६२, क्षेत्र ३०० चौ.मी. (नवीन सर्व्हे नंबर ११८/४/६२) असा आहे. ज्याची चर्तुसिमा पुर्वेस ९ मीटर रोड आहे, पश्चिमेस प्लॉट नंबर ६३ ची मिळकत आहे, दक्षिणेस प्लॉट नंबर ६१ ची मिळकत आहे व उत्तरेस ६ मीटर रूंदिचा रोड आहे. येणे प्रमाणे चर्तुसिमेच्या आतील बिनशेती प्लॉट विकत घेण्याचा करार केला आहे. सदरील प्लॉट पॅपीलॉन गृहनिर्माण सहकारी संस्था कर्जत पैकी आहे. सदर प्लॉटच्या करारापोटी बयाणा रक्कम भोगवटादारास दिलेली आहे.

येणेप्रमाणे वर वर्णन केलेल्या चर्तुसिमांकित प्लॉटबाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचा लेखी आक्षेप संबंधित कागदपत्रांसहीत हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासुन होणाऱ्या २१ (एकवीस) दिवसांच्या मुदतीत खालील पत्त्यावर नोंदवावा. कोणाचाही काहीही आक्षेप न आल्यास मी सदरील प्लॉटचा व्यवहार पुर्ण करून रितसर विक्री करून घेईल व विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप माझ्यावर बंधनकारक राहणार नाही.
करता हे जाहीर प्रगटन.

कर्जत
दिनांक :- ०४/११/२०२६.

सही /-
श्री. गिरीश प्रभाकराव जाधव.
रा. शंकुतला निवास - ०७,
भाग्य नगर रोड, कृष्ण मंदिर जवळ,
शास्त्री नगर, तरोडा बुद्रुक,
नांदेड, महाराष्ट्र, ४३१६०५
मो. नं. ८८०५६५४९००.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

RFX	Description	*Esti. Cost*
Tend-33/26-27 7000042020	Work of electrical safety, fire audit and security audit at various substations under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee Rs. 500/-+GST.**	Rs. 6,21,666.00 (Including taxes.)

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 03.11.2026 at 11:00 Hrs. to 13.11.2026 up to 11:00 hrs, Opening date:-13.11.2026 @11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer (Adm) Mobile No. 8412050202, E-mail ID se7200@mahatransco.in

Sd/-
SUPERINTENDING ENGINEER
EHV (O&M) CIRCLE, PANVEL

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे शिंगढोळ, ता. कर्जत जि. रायगड येथिल खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे कब्जेदारांकडून आमचे अशिलांनी आवश्यक त्या कायदेशीर तरतुदींची पुर्तता करुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

मिळकतीचे वर्णन
मौजे - शिंगढोळ, ता. कर्जत जि. रायगड

कब्जेदाराचे नाव	स.नं.	हि.नं.	क्षेत्र हे.आर-पॉ.	आकार
श्री.अविनाश विठ्ठल शिरसागर श्री. प्रसाद अशोक भोपतराज श्री. मेकांश दिलीप परमार	४७	२	१-९५-०० १-९७-०० ३-९२-००	१.३५

तरी वरील मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त , गहाण, दान, बक्षिस, चार्ज, ॲटॅचमेंट, लिएन अदलाबदली करार, विकसन करार वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील आणि वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

पनवेल,
दिनांक :- ०४/११/२०२६

सही/-
ॲड. शुभांगी निलेश भोपी
पत्ता:- द्वारा, मनोहर नारायण पाटील, सदाशिव बिल्डिंग,
शॉप नं. ७ व ८, तळ मजला, टिळक रोड, गोदरेज
प्लाझा समोर, ता.पनवेल जि.रायगड, मो.नं.८८७९९६६६९१

जाहीर नोटीस

माझे आशिल श्री.देवांग हरीदास ठक्कर व श्री.सतिष हरिदास ठक्कर, मु. पो. झिराड, ता.अलिबाग, जि. रायगड यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येते ती खालील प्रमाणे.

०१) मौजे झिराड, ता.अलिबाग, जि. रायगड व ग्रामपंचायत झिराड हद्दीतील खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत.

भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे.आर.	आकार रू.पैसे
९	०.०८.६०	००.२०

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत व सदरहु मिळकतीत असलेले ग्रामपंचायत क्र. ४०३ ते ४०७ अशी मिळकत या नोटीशीचा विषय असून त्यास यापुढे ''सदरहू मिळकत'' म्हणून संबोधण्यात येत आहे.

०२) माझे आशिल यांनी सदरहु मिळकत श्री.महेंद्र वसंत फडके, मु.सी/१८, ओम मयुरेश सोसायटी, मिठागर रोड, एल.आय.सी.कॉलनी जवळ, मुलुंड (पुर्व), मुंबई ८१ यांजपासून खरेदी करण्याबाबत व्यवहार ठरविला आहे. या संदर्भात संबंधीतांनी माझे आशिल यांचे लाभात दिनांक ०१.०८.२०२२ रोजीचा साठेकरार लिहून दिला असून त्यांना बयाणा रक्कम सुद्धा अदा केली आहे. मात्र, श्री. महेंद्र वसंत फडके यांनी सदर करारा प्रमाणे वागणुक न करता सदरहु मिळकतीमध्ये त्रयस्थांचे हक्क हितसंबंध निर्माण करण्याचा प्रयत्न चालविला आहे. श्री.महेंद्र वसंत फडके, यांना माझे आशिल यांचा हक्क डावलुन सदरहु मिळकतीमध्ये त्रयस्थांचे हक्क निर्माण करण्याचा अधिकार नाही.

०३) तरी, या जाहीर नोटीशीने सर्व लोकांस कळविण्यात येते की, श्री. महेंद्र वसंत फडके, मु.सी/१८, ओम मयुरेश सोसायटी, मिठागर रोड, एल.आय.सी.कॉलनी जवळ, मुलुंड (पुर्व), मुंबई ८१ याचेशी वर नमुद मिळकती बाबत कोणत्याही प्रकारचा खरेदी विक्री व अन्य व्यवहार ठरवू नये. त्यास माझे आशिल यांची सक्त हरकत आहे, याची नोंद घ्यावी. कळावे.

सही/-
अलिबाग **(ॲड.एस.वाय.बारटके)**
तारीख ०३.११.२०२६ **मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड**

जाहीर नोटीस

माझे आशिल श्री. मनमोहन जयकिसन दमानी, श्री. सतिष हरिदास ठक्कर, श्री. नवरतन पनालाल तापडिया व इतर यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येते ती खालील प्रमाणे.

०१) मौजे झिराड, ता.अलिबाग, जि. रायगड व ग्रामपंचायत झिराड हद्दीतील खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत.

गट क्रमांक	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.	आकार रू.पैसे
७	१	०.१६.५०	०२.४०
१५	-	०.१२.४०	००.३०
१६	-	०.१३.००	००.२०

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत व सदरहु मिळकतीत असलेले ग्रामपंचायत क्र. ४१६ ते ४२२, ७१०, ७१८ व ९१० अशी मिळकत या नोटीशीचा विषय असून त्यास यापुढे ''सदरहू मिळकत'' म्हणून संबोधण्यात येत आहे.

०२) माझे आशिल यांनी सदरहु मिळकत श्री. महेंद्र वसंत फडके, मु.सी/१८, ओम मयुरेश सोसायटी, मिठागर रोड, एल.आय.सी. कॉलनी जवळ, मुलुंड (पुर्व), मुंबई ८१ आणि एन.के.प्रॉपर्टीज तर्फे भागीदार श्री.किरण माधव परूळेकर, श्री.नंदकिशोर सिताराम कारखानीस व श्री. महेश प्रभुदास कारीया, मु.बी/१०२, श्रीनाथ प्लाझा, लोकमान्य टिळक रोड, मुलुंड (पुर्व), मुंबई ८१ यांजपासून खरेदी करण्याबाबत व्यवहार ठरविला आहे. या संदर्भात संबंधीतांनी माझे आशिल यांचे लाभात कायदेशीर दस्त लिहून दिला आहे. श्री.महेंद्र वसंत फडके, वगैरे यांनी सदर करारा प्रमाणे वागणुक न केल्यामुळे माझे आशिल यांनी श्री.महेंद्र वसंत फडके, वगैरे यांचे विरूद्ध कराराची विशेष पुर्तता करून मिळणेकरीता अलिबाग दिवाणी न्यायालयात स्पेशल मुकदमा क्र.६७/२०२५ चे प्रकरण दाखल केले असून सध्या ते प्रलंबित आहे.

०३) या व्यतिरिक्त एन.के.प्रॉपर्टीज तर्फ भागीदार श्री.किरण माधव परूळेकर, वगैरे यांनी देखील श्री. महेंद्र वसंत फडके, वगैरे यांचे विरूद्ध कराराची विशेष पुर्तता करून मिळणे करीता अलिबाग दिवाणी न्यायालयात स्पेशल मुकदमा क्र. १३६/२०१४ चे प्रकरण दाखल केले असून ते प्रकरण देखील प्रलंबित आहे. स्पेशल मुकदमा क्र. १३६/२०१४ चे कामी मा. दिवाणी न्यायालयाने श्री. महेंद्र वसंत फडके, वगैरे यांनी सदरहु मिळकतीमध्ये त्रयस्थांचे हक्क हितसंबंध निर्माण करू नये, असा तुर्तातुर्त ताकिदीचा आदेश केला आहे. असे असताना श्री. महेंद्र वसंत फडके यांनी मा. न्यायालयाचे आदेशाचा भंग करून व माझे आशिल यांचा हक्क डावलून मौजे झिराड गट क्र. ७/१, क्षेत्र ०.१६.५० हे.आर. आकार रू. २.४० पैसे, गट क्र.१५, क्षेत्र ०.१२.४० हे.आर. आकार रू. ००.३० पैसे, गट क्र. १६, क्षेत्र ०.१३.०० हे.आर. आकार रू.००.२० पैसे आणि ग्रामपंचायत क्र ४१६ ते ४२२, ७१०, ७१८ व ९१० ही मिळकत ॲड.अनंत देवजी पाटील, मु.कन्या शाळेजवळ, अलिबाग, पो.ता.अलिबाग, जि. रायगड यांना बेकायदेशीर खरेदीखता अन्वये खरेदी दिली आहे.

तरी, या जाहीर नोटीशीने सर्व लोकांस कळविण्यात येते की, ॲड.अनंत देवजी पाटील, मु.कन्या शाळेजवळ, अलिबाग, पो.ता.अलिबाग, जि. रायगड यांना वर नमुद मिळकतीबाबत कोणतेही हक्क व अधिकार प्राप्त झालेले नाहीत अथवा कब्जा मिळालेला नाही, याची नोंद घ्यावी. तसेच ॲड.अनंत देवजी पाटील याचेशी वर नमुद मिळकती बाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार ठरवू नये. त्यास माझे आशिल यांची सक्त हरकत आहे, याची नोंद घ्यावी. कळावे.

अलिबाग **(ॲड.एस.वाय.बारटके)**
तारीख ०३.११.२०२६ मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड

जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे राठीचीवाडी, ता. पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल यांनी त्याचे नमुद विद्यमान कब्जेदार यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे.

गाव	सर्व्हे नं./गट नं./हि.नं.	क्षेत्र हे.आर.	आकार रु.पैसे
राठीचीवाडी	४२	०.२४.००	०.३६
राठीचीवाडी	४३	०.८९.५०	१६.१३
राठीचीवाडी	४४	०.३८.६०	२.१९

वरील क्षेत्र हे आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार यांचे पत्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत दयावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.
टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही/-
ठिकाणः पेण **ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
दि. ०४/११/२०२६ पेण पोलीस स्टेशनजवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण, ता.पेण जि.रायगड -४०२१०७
मो. नं.९८२२०३०३८९

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. निशांत रामदास गंधारकर, रा. मु. पो. नावडे, विठोबा मंदिर जवळ, नावडे गाव, कळंबोली नोड, रायगड, ४१०२१८, श्री. कैलास जनार्दन माळी, रा. श्रीराम मंदिर जवळ, चिरले, जासई, रायगड, ४१०२०६, व श्री. संकेत मधुकर ऐनकर, रा. फ्लॅट नं. १०१, वक्रतुंड अपार्टमेंट, प्लॉट नं. २१, नावडे कॉलनी, तळोजे मजकुर, रायगड, ४१०२०८, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे खांडस, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.

स.नं./ हि.नं.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू.पै.)	भोगवटाधाराकाचे नाव
३९/६	०.५०.००	०.४५	श्रीमती श्वेता वैभव कोतवाल, वैगेरे एकुण १२.
३९/८	०.३८.००	०.३४	श्रीमती श्वेता वैभव कोतवाल, वैगेरे एकुण १२.

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ११ (अकरा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ०४/११/२०२६.

सही / -
ॲड. उषा जे. कांबळे.
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे.
मो.नं.७३८५००४८०६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मौजे शिंगढोळ, ता. कर्जत जि. रायगड येथिल खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे कब्जेदारांकडून आमचे अशिलांनी आवश्यक त्या कायदेशीर तरतुदींची पुर्तता करुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

मिळकतीचे वर्णन
मौजे - शिंगढोळ, ता. कर्जत जि. रायगड

कब्जेदाराचे नाव	स.नं.	हि.नं.	क्षेत्र हे.आर-पॉ.	आकार
श्री.गणेश विठ्ठल क्षिरसागर श्री. प्रसाद अशोक भोपतराज श्री. मनोज भाईचंद ओसवाल	५०	--	०-२१-८० ०-०३-५० ०-२५-३०	०.२५
	४८	--	०-१७-८० ०-००-२० ०-१८-००	०.९४

तरी वरील मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त , गहाण, दान, बक्षिस, चार्ज, ॲटॅचमेंट, लिएन अदलाबदली करार, विकसन करार वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील आणि वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

पनवेल,
दिनांक :- ०४/११/२०२६

सही/-
ॲड. शुभांगी निलेश भोपी
पत्ता:- द्वारा, मनोहर नारायण पाटील, सदाशिव बिल्डिंग,
शॉप नं. ७ व ८, तळ मजला, टिळक रोड, गोदरेज
प्लाझा समोर, ता.पनवेल जि.रायगड, मो.नं.८८७९९६६६९१

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत या मिळकतीच्या विद्यमान मालक श्री. महेश गजानन वर्तक यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचा माझे अशिल दिव्या राजीव वर्तक, रा. विद्यानगर, अलिबाग यांचा मानस आहे. याकरिता सदर मिळकत विकत घेणेबाबत माझे अशिलांनी या मिळकतीचे विद्यमान मालकांशी तशी बोलणी केली आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्र व उपविभाग	क्षेत्र हे.आर.	आकार रु.पैसे
बापळे ता.अलिबाग जि.रायगड	३९१	०-०३-०० ०-०३-३० ०-०६-३०	०.२३
बापळे ता.अलिबाग जि.रायगड	३९६	३-४६-७० ०-७४-५० ४-२१-२०	२१.६०
बापळे ता.अलिबाग जि.रायगड	४२८	८-०१-५० ५-१०-४० १३-११-९०	२७.१८
बापळे ता.अलिबाग जि.रायगड	४८७	०-०४-००	०.०६

वर नमुद संपूर्ण मिळकतीचे एकूण क्षेत्रापैकी श्री. महेश गजानन वर्तक यांचे पाच एकर इतक्या क्षेत्राकरिता

सदर मिळकत ही पूर्णपणे निर्वेध व बोजारहीत असून या मिळकतीवरील आपली मालकी अबाधित आहे तसेच सदरची मिळकत ही आपले प्रत्यक्ष ताबे,कब्जा, वहिवाटीत आहे असा निर्वाळा मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

सबब, या मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, वहिवाट, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास अथवा यांचेसोबत माझे अशिल करत असलेल्या व्यवहारांस कोणाची काही हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्यासंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार खरेदीदारांचे वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व विद्यमान मालकांना या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, व या प्रकारे मागाहुन आलेली अशी कोणाचीही कसलीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक : ०४-११-२०२६

सही/-
ॲड. सचिन जोशी
कार्यालयीन पत्ता :- सदनिका क्र.३,
दुसरा मजला, साईलिला बिल्डींग,
श्रीबाग नं.२, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.
- मुख्य संपादक

पाली नगरपंचायत, पाली

UBL Code : 900863

ध्वनी प्रदूषण व फटाके नियंत्रणाबाबत नागरिकांना आवाहन

मा.मुंबई उच्च न्यायालयाने स्वतःहून दाखल केलेल्या जनहित याचिका मध्ये दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने पाली नगरपंचायतमार्फत नागरिकांना खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करण्याचे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

१. सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यास प्रतिबंध
सार्वजनिक रस्ते, रस्त्याच्या कडेला असलेली ठिकाणे, गल्ली, फुटपाथ व इतर सार्वजनिक ठिकाणी सण / उत्सवाच्या काळात फटाके फोडू नयेत.

२. शांतता क्षेत्रांमध्ये फटाके फोडण्यास विशेष प्रतिबंध
मा. न्यायालये, रुग्णालये, शासकीय कार्यालये, शाळा व इतर शांतता क्षेत्रांच्या परिसरात फटाके फोडू नयेत.

३. ध्वनिवर्धक यंत्रणेबाबत आवश्यक परवानगी व अटींचे पालन करणे
सार्वजनिक कार्यक्रम, मिरवणुका किंवा इतर कार्यक्रमांमध्ये ध्वनिवर्धक यंत्रणेचा वापर करण्याकरिता सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेणे व परवानगीच्या सर्व अटींचे पालन करणे आवश्यक राहील.

४. ध्वनी व वायु प्रदूषण टाळा
फटाके व ध्वनिवर्धक यंत्रणांमुळे ध्वनी प्रदूषण तसेच फटाक्यांमुळे वायू प्रदूषण होऊन नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने सण/उत्सव साजरे करावेत.

५. फटाक्यांच्या वापराबाबत आवाहन
तुलनेने कमी ध्वनी व कमी उत्सर्जन करणाऱ्या Green Crackers(हरित फटाके) चा वापर करण्यास प्राधान्य द्यावे. Green Crackers(हरित फटाके) म्हणजे तुलनेने कमी प्रदूषणकारी फटाके असून त्यांच्या निर्मितीमध्ये पारंपरिक फटाक्यांच्या तुलनेत प्रदूषक घटकांचे प्रमाण कमी ठेवले जाते.

Green Crackers(हरित फटाके) हे पूर्णपणे प्रदूषणमुक्त नसतात, त्यामुळे त्यांचा वापर करतानाही लागू असलेल्या नियमांचे व वेळेच्या मर्यादांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

मा, मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करून शांत, सुरक्षित व प्रदूषणनियंत्रित सण/उत्सव साजरे करण्याच्या अनुषंगाने सर्व नागरिकांनी पाली नगरपंचायतीस सहकार्य करावे.

दिनांक : २ नोव्हेंबर २०२६

(स्वाक्षरी/-)
मुख्याधिकारी पाली
नगरपंचायत, पाली

अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड
क्रमांक/आरटीएस/अपील क्र.२९२/२०२६

नागू लक्ष्मण पाटील मयत तर्फे वारस
१ श्रीम.आनंदी नागू पाटील
२ श्री.अशोक नागू पाटील
३ श्री.नंदकुमार नागू पाटील
४ श्रीम.अस्मिता अशोक कोळगांवक

निवडक

टेबल टेनिस स्पर्धेस प्रतिसाद

पनवेल : मुंबई विभागीय शालेय टेबल टेनिस स्पर्धा आयोजित करण्यात आली. १४ वर्षांखालील मुलींच्या सांघिक स्पर्धेत प्रथम क्रमांक फादर ॲग्नेल्स स्कूल, द्वितीय क्रमांक लोढा वर्ल्ड स्कूल कल्याण-डोंबिवली, तृतीय क्रमांक बाल भारती पब्लिक स्कूल पनवेल शाळेने पटकावला. १४ वर्षांखालील मुलींची स्पर्धेत प्रथम क्रमांक हरीणी शाम, द्वितीय क्रमांक पलक झावर, तृतीय क्रमांक तृषा मोरे हिने पटकावला. १४ वर्षांखालील मुलांच्या सांघिक स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ. ए. के. जोशी इंग्लिश मीडियम स्कूल ठाणे, द्वितीय क्रमांक बॉम्बे इंटरनॅशनल स्कूल, तृतीय क्रमांक सेंट ऑगस्टीन स्कूल, वसई शाळेने पटकावला.१४ वर्षांखालील मुलांच्या वैयक्तिक स्पर्धेत प्रथम क्रमांक अयान अथर नाहर इंटरनॅशनल स्कूल, द्वितीय क्रमांक आकर्षण यादव भारत इंग्लिश हायस्कूल, तृतीय क्रमांक प्रणित उपाध्याय आयडियल इंग्लिश स्कूलने पटकावला. १९ वर्षांखालील मुलींच्या सांघिक स्पर्धेत प्रथम क्रमांक फादर ॲग्नेल्स स्कूल नवी मुंबई, द्वितीय क्रमांक व्ही. जी. वाझे कॉलेज, तृतीय क्रमांक शुभम राजे ज्युनिअर कॉलेज ठाणेने पटकावला.१९ वर्षांखालील मुलींच्या वैयक्तिक स्पर्धेत प्रथम क्रमांक अन्वी गुप्ते, द्वितीय क्रमांक सुकृती शर्मा, तृतीय क्रमांक अनिषा पात्राने पटकावला. १९ वर्षांखालील मुलांच्या सांघिक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिठीबाई कॉलेज, द्वितीय क्रमांक सी. एच. एम. कॉलेज, , तृतीय क्रमांक जय हिंद कॉलेजने पटकावला. १९ वर्षांखालील मुलांच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मयुरेश सावंत, द्वितीय क्रमांक दिव्य अमृते, तृतीय क्रमांक विहान गावंड खालसा कॉलेज याने पटकावला. स्पर्धेचे चीफ रेफ्री डी. आर. साळस्कर शामल व पराग अंकोलेकर यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली होती.

जीझस डी मिगेलचे निधन

स्पेन: स्पॅनिश सेकंड डिव्हिजनच्या एका सामन्यादरम्यान झालेल्या भीषण अपघातात गंभीर दुखापत झाल्यामुळे टेनेरिफ क्लबचा स्टार स्ट्राइकर जीसस डी मिगुएलचे निधन झाले आहे. त्याच्या निधनाने क्रीडाविश्वात शोककळा पसरली आहे.स्पॅनिश सेकंड डिव्हिजन स्पर्धेतील एका सामन्यादरम्यान, एफसी अंडोरा संघाच्या गोलकीपरसोबत जीसस डी मिगुएलची भीषण टक्कर झाली. या दुर्घटनेत त्याच्या डोक्याला आणि शरीराच्या इतर महत्त्वाच्या अवयवांना दुखापत झाली. मैदानावर झालेल्या या आघातानंतर त्याला तातडीने वैद्यकीय मदत दिली गेली आणि तातडीने त्याला हॉस्पिटलमध्ये



नेण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच त्याची प्राणज्योत मालवली आहे. हा संपूर्ण प्रकार सामन्याच्या अगदी शेवटी घडला. सातव्या मिनिटाला टेनेरिफ आणि अंडोरा यांच्यातील हा सामना २-२ असा बरोबरीत चालू होता. तेव्हाच ही दुर्घटना घडली. अंडोरा संघाचा गोलकीपर ओवोनों गोलपोस्ट सोडत बॉल क्लिअर करण्यासाठी सेंटर सर्कलच्या दिशेने वेगाने धावला. याच दरम्यान, त्याचा गुडघा वेगात पुढे येत असलेल्या स्ट्राइकर जीसस डी मिगुएलला लागला.

सेंथिलकुमारला चेक ओपनचे जेतेपद

नवी दिल्ली : भारतीय स्क्वॅश खेळाडू वेलावन सेंथिलकुमारने स्कॉटलंडच्या टॉप सीड असलेल्या ग्रेग लोबनचा पराभव करत यूएसडी ३५,००० च्या चेक ओपनचे जेतेपद आपल्या नावे केले. ही एक पीएसए कॉपर-लेव्हल स्पर्धा होता.चौथे सीड असलेला भारतीय जो सध्या जागतिक ४२ व्या क्रमांवार आहे, त्याने जागतिक ३१ व्या क्रमांकावरील लोबनचा १३-११, ११-५, ८-११, ११-७ असा पराभव करत आपले १२ वे पीएसए टूर टायटल आणि कॉपर लेव्हलवरील दुसरे टायटल जिंकले. सेंथिलकुमारने ऑगस्टमध्ये बुडापेस्ट ओपनमध्ये या कॅटेगरीत आपले पहिले टायटल जिंकले होते.सेंथिलकुमारला ट्रॉफीपर्यंत पोहचण्यासाठी कठिण ड्रॉचा सामना करावा लागला. ज्याची सुरुवात ब्राझीलच्या डिएगो गोब्बीवर दुसऱ्या राउंडमध्ये मिळवलेल्या विजयाने झाली. त्यानंतर क्वार्टर फायनलमध्ये अर्जेंटीनाच्या आठव्या सीड जेरेमियास अजानचा त्याने ११-३, ११-८, ११-७ असा पराभव केला.त्याने आपला हा लय अखेरच्या सामन्यातही कायम राखला. सेमिफायनलमध्ये फ्रान्सच्या ऑगस्टे डूसॉर्डविरुद्ध त्याने शानदार कामगिरी केली. भारतीय खेळाडूने हा सामना ११-७, १२-१०, ११-१ असा जिंकत जेतेपदाच्या सामन्यात आपली जागा पक्की केली. या काळात लोबनने फ्रान्सच्या तौफिक मेखाल्फीवर सरळ सेटमध्ये विजय मिळवत अखेरच्या सामन्यात आपली जागा निश्चित केली. अशाप्रकारे स्पर्धेत टॉप सीड व चौथ्या क्रमांकाच्या सीड यांच्यातील सामना निश्चित झाला. एकप्रकारे फायनल सेंथिलकुमार कठिण परिक्षा ठरली, खासकरून सुरुवातीच्या गेममध्ये, जो अखेरपर्यंत चालला.भारतीय खेळाडूने हिम्मत कायम राखताना हा १३-११ असा आपल्या नावे केला व त्यानंतर दुसऱ्या गेममध्ये जास्त नियंत्रण प्राप्त करत तो ११-५ असा जिंकला. लोबनने पुनरागमन करताना तिसरा गेम ११-८ असा आपल्या नावे केला, पण सेंथिलकुमारने स्वतःला सावरत सेट ११-७ असा जिंकत ट्रॉफी आपल्या नावे केली.



ग्लेन मॅक्सवेलने घेतली निवृत्ती

सिडनी : ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाचा स्फोटक फलंदाज ग्लेन मॅक्सवेलने वयाच्या ३८ व्या वर्षी इंटरनॅशनल क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. ग्लेन मॅक्सवेलने आपल्या स्फोटक फलंदाजीने ऑस्ट्रेलियाला अनेक सामने जिंकवून दिले आहेत. वर्ल्डकपमध्ये अफगाणिस्तानविरुद्ध त्याने दुखापत झालेली असताना केलेली खेळी त्याच्या कारकीर्दीतली सर्वात महत्वाची खेळी ठरली होती. त्यावलेस त्याने दुहेरी शतक ठोकत अफगाणिस्तानविरुद्ध ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून दिला आहे. ग्लेन मॅक्सवेल आपल्या स्फोटक आणि आक्रमक फलंदाजीसाठी ओळखला जात असे. फिरकी गोलंदाजी आणि चपळ क्षेत्ररक्षण यामध्ये त्याने स्वतःची एक ओळख निर्माण केली होती. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा करण्यापूर्वी मॅक्सवेल या लीगमध्ये खेळताना दिसून आला होता. ग्लेन मॅक्सवेलने २०१२ मध्ये इंटरनॅशनल क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. आपल्या अफाट आणि आक्रमक फलंदाजीच्या जोरावर त्याने अत्यंत कमी वेळात जागतिक क्रिकेटमध्ये स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण केले. मैदानाच्या कोणत्याही भागात मोठे फटके मारण्याची क्षमता त्याच्याकडे होती.

विश्वचषक २०२७ चा भारत-पाक सामना

तिकिटासाठी ८४ लाख अर्ज

विश्वचषकाच्या फायनलपेक्षाही जास्त मागणी; ३४ हजार प्रेक्षक क्षमतेच्या स्टेडियममध्ये सामना होणार

| जोहान्सबर्ग | वृत्तसंस्था |

वनडे विश्वचषक २०२७ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्याबाबत चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह आहे. १० ऑक्टोबर रोजी जोहान्सबर्गच्या वांडरर्स स्टेडियममध्ये होणाऱ्या या सामन्यासाठी ८४ लाखांहून अधिक तिकीट अर्ज प्राप्त झाले आहेत. स्टेडियमची प्रेक्षक क्षमता केवळ ३४ हजार आहे. म्हणजेच उपलब्ध आसनांच्या तुलनेत सुमारे २४७ पट अधिक अर्ज आले आहेत.

आयसीसीच्या माहितीनुसार, भारत-पाक सामन्यासाठी एकूण ८३,९७,२९४ तिकीट अर्ज प्राप्त झाले आहेत. तर २१ नोव्हेंबर रोजी याच स्टेडियममध्ये होणाऱ्या विश्वचषकाच्या अंतिमसामन्यासाठी ७९,००,९४४ अर्ज आले आहेत. अशा प्रकारे तिकिटांच्या मागणीच्या बाबतीत भारत-पाकिस्तान



सामना पहिल्या क्रमांकावर आहे. तिकिटांसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया २१ नोव्हेंबर २०२६ पर्यंत सुरू राहील. यामध्ये प्रथम नोंदणी केली जाईल आणि मागणी जास्त असल्यास संगणकीकृत यादृच्छिक लॉटरीद्वारे तिकिटे खरेदी करण्यासाठी अर्जदारांची निवड केली जाईल. ही आधी येणाऱ्यास प्राधान्य देणारी प्रणाली नाही.

आयसीसीला आतापर्यंत या स्पर्धेसाठी १९३ देशांमधून १२ कोटींहून अधिक तिकिटांचे अर्ज मिळाले आहेत. दक्षिण आफ्रिकेत होणाऱ्या ४१ सामन्यांसाठीच १०.५ कोटींहून अधिक अर्ज मिळाले आहेत. यामध्ये यजमान संघाच्या सामन्यांसाठी सुमारे २.६ कोटी अर्ज आले आहेत.२०२७ चा वनडे विश्वचषक २४ वर्षांनंतर आफ्रिकन भूमीवर परतणार आहे. दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया संयुक्तपणे या स्पर्धेचे यजमानपद भूषवतील. या स्पर्धेत १४ संघ सहभागी होतील आणि १२ स्थळांवर एकूण ५७ सामने खेळवले जातील. वर्ल्ड कपसाठी १२ ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. यापैकी ८ दक्षिण आफ्रिकेत, ३ झिम्बाब्वेमध्ये आणि १ नामिबियामध्ये आहे. नामिबिया प्रथमच पुरुषांच्या वरिष्ठ वर्ल्ड कप सामन्यांचे यजमानपद भूषवणार आहे. दक्षिण आफ्रिका आणि झिम्बाब्वे यापूर्वी २००३ च्या वर्ल्ड कपचे यजमानपद भूषवले आहे.

यापूर्वीही केले होते लॉटरीद्वारे तिकीट वाटप

२०११ वनडे विश्वचषक : भारतातील उपांत्य फेरी आणि अंतिम सामन्याच्या तिकिटांसाठी आयसीसीने सार्वजनिक लकी ड्रॉ प्रणाली स्वीकारली होती. वेबसाइटवर मोठ्या प्रमाणात ट्रॅफिक आल्यामुळे तिकीट विक्रीत अडचणी निर्माण झाल्या होत्या.

२०१६ टी-२० विश्वचषक : भारताचे सामने, उपांत्य सामने आणि अंतिम सामन्याच्या तिकिटांसाठी लॉटरी प्रणाली ठेवण्यात आली होती. यशस्वी अर्जदारांना तिकीट खरेदी करण्याची संधी मिळाली होती.

२०१९ वनडे विश्वचषक : आयसीसीने दोन टप्प्यांत तिकिटांसाठी लकी ड्रॉ आयोजित केला होता. यामध्ये प्रथम क्रिकेट कुटुंबासाठी लकी ड्रॉ आणि त्यानंतर सार्वजनिक लकी ड्रॉचा समावेश होता.

२०२४ टी-२० विश्वचषक : आयसीसीने सार्वजनिक तिकीट लकी ड्रॉ आयोजित केला होता. भारत-पाकिस्तान सामन्यासाठीही उपलब्ध आसनांच्या तुलनेत तिकिटांची मागणी २०० पट अधिक होती.

रायगडचा संघ उपांत्य फेरीत

सनराईज एसबीए कप बॅडमिंटन स्पर्धा

| पुणे | प्रतिनिधी |

सुधांशु बॅडमिंटन अकादमीच्या वतीने आणि समर्थ ग्रुपच्या सहकार्याने आयोजित योनेक्स सनराईज एसबीए कप राज्यस्तरीय सब-ज्युनियर आंतरजिल्हा सांघिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत मुलांच्या आणि मुलींच्या गटातील उपांत्यपूर्व फेरीचे सामने चुरशीचे झाले. यामध्ये मुलांच्या गटातून रायगड, ठाणे, बुलढाणा आणि नागपूर, तर मुलींच्या गटातून पुणे, नागपूर, रायगड आणि मुंबई उपनगर या संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर मात करत उपांत्य फेरीत प्रवेश केला.

शिवाजीनगर येथील पी. ई. सोसायटीच्या मॉडर्न पीडीएमबीए स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समधील बॅडमिंटन कोर्टवर ही स्पर्धा सुरू आहे.



मुलींच्या गटातील उपांत्यपूर्व फेरीत मनीषा तिरुकोंडा कुमार, शरयू रांजणे आणि सोयरा शेलार यांच्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर पुणे संघाने पालघर संघाचा २-० असा एकतर्फी पराभव केला. पुणे संघाने एकेरी आणि दुहेरी अशा दोन्ही लढती जिंकत उपांत्य फेरीतील स्थान निश्चित केले.

नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर यांच्यातील सामना चांगलाच रंगतदार झाला. नागपूर संघाने २-१ असा विजय मिळवत पुढील फेरीत प्रवेश केला.

विजयी घोडदौड कायम राखली

मुलांच्या गटात ठाणे संघाने अमरावतीवर २-० अशी मात केली. विश्वजीत थविल आणि मयंक राजपूत यांनी विजयात मोलाचा वाटा उचलला. बुलढाणा संघानेही सांगलीचा २-० असा पराभव करत आपली विजयी घोडदौड कायम राखली. बुलढाण्याकडून देवव्रत खांडेकर आणि करण सावळे यांनी दमदार खेळाचे प्रदर्शन केले. रायगडने सातारा संघाचा २-० असा, तर नागपूरने मुंबई शहर संघाचा २-० असा पराभव करत उपांत्य फेरी गाठली.

नागपूरकडून वैष्णवी मांगलेकर आणि सान्वी घाटे यांनी एकेरीच्या लढतीत प्रभावी खेळ केला.

पीएनपी महाविद्यालयाचे अंतरविभागीय

कबड्डी स्पर्धेत रौप्यपदक

सहा खेळाडूंची कोकण विभागाच्या संघात निवड



| अलिबाग | प्रतिनिधी |

मुंबई विद्यापीठातर्फे अंतरविभागीय कबड्डी स्पर्धा २०२६-२७चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत कोकण विभागाच्या मुलांच्या आणि मुलींच्या दोन्ही संघांनी दमदार कामगिरी करत रौप्यपदकावर आपली मोहोर उमटवली आहे. विशेष म्हणजे या दोन्ही संघांमध्ये अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजच्या सहा खेळाडूंचा समावेश होता. त्यामुळे पीएनपी महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या स्पर्धेसाठी कोकण विभागाच्या मुलांच्या संघात महाविद्यालयातील नीरज मिसाळ, स्मित म्हात्रे, प्रेम कांबळे आणि निशांत म्हात्रे या चार खेळाडूंची, तर मुलींच्या संघात ऋतुजा पाटील आणि चैत्राली म्हात्रे या दोन खेळाडूंची निवड झाली होती. या सहाही खेळाडूंनी आपल्या कौशल्यपूर्ण खेळाच्या जोरावर कोकण विभागाचे प्रतिनिधित्व करत महाविद्यालयाचा नावलौकिक उंचावला आहे. या स्पर्धेमध्ये दोन्ही संघांनी प्रतिस्पर्ध्यांना चुरशीची लढत देत जिद्द, चिकाटी, सांघिक एकजूट आणि उत्कृष्ट खेळाचे दर्शन घडविले. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर मुलांच्या आणि मुलींच्या अशा दोन्ही संघांनी रौप्यपदकाची कमाई केली. त्यामुळे एकाच महाविद्यालयातील सहा खेळाडूंची विद्यापीठाच्या अंतरविभागीय स्पर्धेत कोकण विभागाच्या संघात निवड होणे आणि दोन्ही संघांनी रौप्यपदक पटकाविणे ही महाविद्यालयासाठी अभिमानास्पद कामगिरी ठरली आहे.

या यशाबद्दल संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, कॉलेजचे संचालक विक्रांत वार्डे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, कार्यालयीन समन्वयक गबाजी गीते, क्रीडा प्रशिक्षक प्रा. तेजेश म्हात्रे, क्रीडा विभागप्रमुख प्रा. स्वराली ठाकूर, प्रा. हर्षल काठे, प्रा. लवेश पाटील आणि प्रा. जयश्री ठाकूर यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

सुवर्णपदकासाठी खो-खोपटूंचे रणशिंग!

| मुंबई | प्रतिनिधी |

खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राचा दबदबा कायम राखण्यासाठी राज्याच्या कुमार आणि मुलींच्या संघांनी कंबर कसली आहे. गुजरातमधील वडोदरा येथे होणाऱ्या ४५ व्या कुमार-मुली राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत सुवर्णपदक पटकावण्याचे लक्ष्य ठेवून दोन्ही संघांची विशेष निवासी प्रशिक्षण शिबिरे सुरू झाली आहेत.मुलींचा संघ धाराशिवम ध्ये, तर कुमार संघ सांगली येथे सराव करत आहे. महाराष्ट्राच्या मुलींच्या संघाचे प्रशिक्षण शिबिर १ नोव्हेंबरपासून धाराशिव येथे सुरू झाले. धाराशिव नगरपालिकेच्या अध्यक्षा नेहा काकडे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नगरसेवक राहुल काकडे, नगरसेविका राजकन्या अडसूळ, महाराष्ट्र खो-खो संघटनेचे सरचिटणीस डॉ. चंद्रजीत जाधव, प्रशिक्षण विभागप्रमुख राजेंद्र साप्ते आणि अथर्व तापडिया उपस्थित होते.

राष्ट्रीय वार्षिक कराटे प्रशिक्षण शिबीर पेणमध्ये

| चिरनेर | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात मार्शल आर्ट क्षेत्रातील चौदाव्या वार्षिक राष्ट्रीय कराटे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. विजय विकास सामाजिक संस्था आणि महाराष्ट्र यांच्या मुख्य आयोजना बरोबर इंटरनॅशनल, इंडिया, शोतोकान कराटे डो स्पोर्ट्स असोसिएशन, रायगड मिक्स बॉक्सिंग असोसिएशन आणि इंडियन मिक्स बॉक्सिंग फेडरेशन या सर्वांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. १२ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर या कालावधी दरम्यान कामाली, कुंभार्ली येथील श्री बल्लाळेश्वर फार्म हाऊस येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्याबाहेरील विद्यार्थ्यांसाठी गुरुवारी (दि.१२) सकाळी ९ वाजता जेएनपीटी-टाऊनशिप स्टाफ क्लब येथे रिपोर्टिंग ठेवण्यात आले असून तेथून आयोजकांतर्फे अंतर्गत वाहतुकीची व्यवस्था करण्यात येणार आहे.



या चार दिवसीय निवासी शिबिरात सिनियर मास्टर्सच्या मार्गदर्शनाखाली फुल कॉन्टॅक्ट कराटे, सेमी कॉन्टॅक्ट, ज्युडो, मिक्स बॉक्सिंग, वेपन्स, जुजुत्सू, सिनियर काताज् त्यांच्याकडून प्रशिक्षण दिले जाणार असून, मुलींसाठी विशेष स्व-संरक्षण प्रशिक्षण, प्रशिक्षक प्रशिक्षण आणि मैत्रीपूर्ण स्पर्धा परीक्षाही घेतली जाणार आहे. शिबीर शुल्क ३५०० रूपये असून यामध्ये राहण्याची सोय, अंतर्गत वाहतूक, नाश्ता, जेवण, प्रमाणपत्र, स्पर्धा, बक्षिसे, प्रथमोपचार आणि मनोरंजन कार्यक्रमाचा समावेश आहे.

शिस्त, आत्मविश्वास, स्व-संरक्षण, मजबूत मन आणि निरोगी जीवन ही या शिबिराची मुख्य उद्दिष्टे आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी आपला अर्ज शिबीर शुल्कासह ५ दिवस आधी जमा करणे बंधनकारक असून शिबिरात मोबाईल फोन, धूम्रपान, तंबाखू, गुटखा यांना सक्त मनाई असून संपूर्ण शिस्त पाळणे अनिवार्य आहे.

या शिबिरासंदर्भात अधिक माहितीसाठी विकास भोईर ९२२२०२२४८८, प्रगती भोईर ८७७९५३९६६७, दिपक घरत ९९२०३५४३८३, मिलन जाधव ८३६९३२०२१६ आणि अथर्व घरत ९३२१५७३४२४ यांच्याशी संबंधित क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

राज्य शालेय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धा | **५०० हून अधिक शाळांचा सहभाग**

युवा बुद्धिबळपटूंचा महासंग्राम!

| मुंबई | प्रतिनिधी |

बुद्धिबळाच्या पटावर डावपेचांची लढाई रंगविण्यासाठी महाराष्ट्रातील ८०० हून अधिक युवा बुद्धिबळपटू सज्ज झाले आहेत. इंडियन चेस स्कूलतर्फे आणि रुस्तमजी केंब्रिज इंटरनॅशनल स्कूल, दहिसर यांच्या यजमानपदाखाली आयोजित एसबीआय लाइफ महाराष्ट्र राज्य शालेय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेला यंदा विक्रमी प्रतिसाद लाभला आहे.

राज्यातील ५०० हून अधिक शाळांमधील खेळाडूंचा सहभाग



असलेली ही स्पर्धा ४ ते ६ आणि १३ ते १५ नोव्हेंबर अशा दोन टप्प्यांत रंगणार आहे.

सात, नऊ, ११, १३, १५ आणि १७ वर्षांखालील वयोगटांत मुलांचे आणि मुलींचे स्वतंत्र असे एकूण १२ गट असतील. विशेष म्हणजे, ४०० हून अधिक फिडे मानांकित खेळाडू या बुद्धिबळाच्या रणांगणात उतरतील. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके जिंकलेल्या खेळाडूंचाही समावेश असल्याने प्रत्येक डावात चुरस आणि डावपेचांची कसोटी पाहायला मिळणार आहे.

विजेत्यांसाठी एक लाख २० हजार रुपयांची रोख पारितोषिके, ३६ चषक आणि १२० पदकांची लयलूट असेल. अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघ, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना आणि मुंबई उपनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेची मान्यता या स्पर्धेला आहे. सर्व १२ गट फिडे मानांकित असून कामगिरीची आंतरराष्ट्रीय मानांकनासाठी नोंद होणार आहे. फिडेचा प्रतिष्ठेचा बी श्रेणीचा दर्जा मिळवलेले आंतरराष्ट्रीय पंच पी. बी. भिलारे मुख्य पंच म्हणून काम पाहतील. डीजीटी इलेक्ट्रॉनिक बुद्धिबळ पटांद्वारे सामन्यांचे थेट प्रक्षेपण, तसेच नामवंत तज्ज्ञांचे समालोचन आणि विश्लेषण हे स्पर्धेचे खास आकर्षण ठरणार आहे.

एसबीआय लाइफचे इंडियन चेस स्कूलच्या स्पर्धांना मिळणारे हे सातवे प्रायोजकत्व आहे. युवा बुद्धिबळपटूंना राष्ट्रीय स्तरावर झेप घेण्याची संधी देणारा हा महासंग्राम आता कोण चेकमेट करणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

प्रत्येक खेळाडूला ६० मिनिटांचा वेळ

स्विस लीग पद्धतीने सात फेऱ्यांत होणाऱ्या स्पर्धेत प्रत्येक खेळाडूला ६० मिनिटे आणि प्रत्येक चालीसाठी ३० सेकंदांची वाढ मिळेल. प्रत्येक गटातील अव्वल दोन खेळाडूंना डिसेंबरमध्ये अहमदाबाद येथे होणाऱ्या राष्ट्रीय शालेय अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक** : **स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक** : **मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक** : **माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक** : **प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)